दि म्युनिसिपल को-ऑप. बँक लिमिटेड, मुंबई



७३ वा
वार्षिक अहवाल
२०२४-२०२५

पैशाबरोबर विश्वास जपणारी माणसे

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

पदसिध्द अध्यक्ष



श्री. भूषण गगराणी
महापालिका आयुक्त

पदसिध्द उपाध्यक्ष



श्री. अभिजीत बांगर
महापालिका अतिरिक्त आयुक्त

संचालक मंडळ

कार्याध्यक्ष



श्री. विश्वास शंकरवार
महापालिका सह-आयुक्त
(दिनांक २७.०२.२०२५ पर्यंत)

कार्याध्यक्ष



श्री. किशोर गांधी
महापालिका उप-आयुक्त

उप-कार्याध्यक्ष



श्री. देविदास क्षीरसागर
महापालिका उप-आयुक्त

तज्ञ संचालक



श्री. शरद नि. उघडे
महापालिका उप-आयुक्त
(दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)



श्री. सुनिल तु. जांगळे
महापालिका प्रमुख कामगार अधिकारी
(दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई



श्री. किरण खं. आव्हाड



श्री. विष्णू ग. घुमरे



श्री. विवेक वि. आठवले



श्री. मुकेश व. घुमरे



श्री. अभिजित ना. बागुल



श्री. सुरेश तु. घारे



श्री. महेश ग. ठाकरे



श्री.बिपीन अ. बोरीचा



श्री. संतोष रा. दरेकर



श्री. रविंद्र कि. दामोदरे



श्री. विजय ना. जाधव



श्री. कुणाल र. कसबे



श्री. इंदल ता. राठोड



श्री. नितीन का. बनसोडे



श्री. गिरीष चि. जाधव



श्री. भानुदास वि. भोईर



श्री. राजेंद्र स. कराडे



श्रीमती. कविता कि. विशे



श्रीमती. लीना उ. इंगळे



श्री. संदिप बा. साळवी
कर्मचारी प्रतिनिधी




श्री. अनंत ग.धनावडे
कर्मचारी प्रतिनिधी




श्री. विनोद ही. रावदका
महाव्यवस्थापक

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई


उत्पन्नाचा रुपया



खर्चाचा रुपया



प्रगतीचा आलेख



दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

पदसिध्द अध्यक्ष

श्री. भूषण गगराणी, आय.ए.एस.
महापालिका आयुक्त

पदसिध्द उपाध्यक्ष

श्री. अभिजीत बांगर, आय.ए.एस.
महापालिका अतिरिक्त आयुक्त

संचालक मंडळ

अध्यक्षांनी (महापालिका आयुक्तांनी) नियुक्त केलेले संचालक

कार्याध्यक्ष

श्री. विश्वास शंकरवार
महापालिका सह-आयुक्त
(दिनांक २७.०२.२०२५ पर्यंत)

कार्याध्यक्ष

श्री. किशोर गांधी
महापालिका उप-आयुक्त

उप-कार्याध्यक्ष

श्री. देविदास क्षीरसागर
महापालिका उप-आयुक्त

तज्ञ संचालक

श्री. शरद नि. उघडे
महापालिका उप-आयुक्त
(दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)

श्री. सुनिल तु. जांगळे
महापालिका प्रमुख कामगार अधिकारी
(दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)

सभासदांनी निवडून दिलेले संचालक

श्री. महावीर दा. बनगर (दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)
श्री. प्रदीप बा. सावंत (दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)
श्री. अभिषेक प्र. मोहिते (दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)
श्री. दयाराम उ. आडे (दिनांक ३१.०१.२०२५ पर्यंत)
श्री. संजय धों. जाधव (दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)
श्री. जालंदर ल. चकोर (दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)
श्री. विलास कृ. साळुंके (दिनांक २०.०८.२०२५ पर्यंत)
सौ. वर्षा अ. माळी (दिनांक ३१.०१.२०२५ पर्यंत)

पंचवार्षिक निवडणूकीत सभासदांनी नव्याने निवडून दिलेले संचालक

श्री. किरण खं. आव्हाड
श्री. विष्णू ग. घुमरे
श्री. विवेक वि. आठवले
श्री. मुकेश व. घुमरे
श्री. अभिजित ना. बागुल
श्री. सुरेश तु. घारे
श्री. महेश ग. ठाकरे
श्री. बिपीन अ. बोरीचा
श्री. संतोष रा. दरेकर
श्री. रविंद्र कि. दामोदरे
श्री. विजय ना. जाधव
श्री. कुणाल र. कसबे
श्री. इंदल ता. राठोड
श्री. नितीन का. बनसोडे
श्री. गिरीष चि. जाधव
श्री. भानुदास वि. भोईर
श्री. राजेंद्र स. कराडे
श्रीमती. कविता कि. विशे
श्रीमती. लीना उ. इंगळे

कर्मचारी प्रतिनिधी

श्री. संदिप बा. साळवी

श्री. अनंत ग.धनावडे

महाव्यवस्थापक

श्री. विनोद ही. रावदका

✣ ✣ ✣

वैधानिक लेखा परिक्षक : मे. लाहोटी कासट ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई



बँकेची ७२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे मा. कार्याध्यक्ष श्री. विश्वास व्यं. शंकरवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. उप-कार्याध्यक्ष श्री. देविदास शि. क्षीरसागर, मा. तज्ञ संचालक ॲड. श्री. सुनिल क. सोनवणे, मा. संचालक श्री. विष्णू ग. घुमरे, श्री. महावीर दा. बनगर, श्री. प्रदीप बा. सावंत, श्री. बिपीन अ.बोरीचा, श्री. मुकेश व. घुमरे, श्री. अभिषेक प्र. मोहिते, श्री. अभिजित ना. बागुल, श्री. संजय धों. जाधव, श्री. दयाराम उ. आडे, श्री. भानुदास वि. भोईर, श्री. किरण खं. आव्हाड, श्री जालंदर ल. चकोर, श्री. विलास कृ. साळुंके, श्री. महेश ग. ठाकरे, श्री. राजेंद्र स. कराडे, मा. संचालिका सौ. वर्षा अ. माळी, कर्मचारी प्रतिनिधी श्री. संदिप बा. साळवी, श्री. अनंत ग. धनावडे , बँकेचे महाव्यवस्थापक श्री. विनोद ही. रावदका, उप-महाव्यवस्थापक श्री. भगवान पाटील हे उपस्थित होते.



बँकेच्या ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेले बँकेचे सन्माननीय सभासद.

स्थापना १९५२ नोंदणी क्रमांक २०२७२

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

मुंबई, दिनांक : १५.०९.२०२५

७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांची त्र्याहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी, सायंकाळी ५.०० वाजता श्री शिवाजी मंदिर, न. चिं. केळकर पथ, दादर (प.), मुंबई-४०० ०२८ येथे खालील कामकाजांचा विचार करण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित राहावे.

विषयपत्रिका

१) दिनांक ३०.०८.२०२४ रोजी झालेल्या ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास व वैधानिक हिशेब तपासनीसांनी तपासलेले दि.३१ मार्च २०२५ अखेरचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यांस मान्यता देणे.

३) दिनांक ०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५ या कालावधीकरीता वैधानिक हिशेब तपासनीस यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणे व सन २०२३-२०२४ च्या वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवालाची नोंद घेणे.

४) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या नामतालिकेमधील, भारतीय रिझर्व्ह बँकेने मंजूरी दिलेल्या वैधानिक लेखा परिक्षकांच्या नेमणूकीस मान्यता देणे.

५) नफा वाटणीस मंजूरी देणे.

६) मा. वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणीत केलेली वसूल न होणारी संशयीत व बुडीत येणे बाकी कर्ज वसूलीचे अधिकार अबाधीत राखून कर्जे निर्लेखित करण्यास मंजुरी देणे.

७) बँकेच्या ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांची गैरहजेरी माफ करणे.

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने, नियमांस अनुसरुन, आयत्यावेळी येणाऱ्या कामकाजाचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या हुकूमावरुन

वि.ही. रावदका

महाव्यवस्थापक

ठिकाण : मुंबई

दिनांक : १५.०९.२०२५

सूचना

१) सर्वसाधारण सभेच्या निश्चित केलेल्या वेळी गणसंख्या पूर्ण न झाल्यास सभा तहकूब करण्यात येईल. अशी तहकूब झालेली सभा त्यानंतर अर्ध्या तासाने त्याच दिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल अशा सभेस गणसंख्येच बंधन असणार नाही.

२) सभासदांना वरील कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास त्यांनी कार्यालयीन वेळेत, मुख्य कार्यालयात, महाव्यवस्थापक यांना पूर्वसूचनेनुसार भेटावे.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने सभासदांनी त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत सभेपूर्वी ७ दिवस अगोदर लेखी सूचना द्यावी व सभेच्या वेळी संबंधीत विषयावरील चर्चा चालू असताना त्याबाबत विचारणा करावी. आयत्यावेळी विचारलेली माहिती देणे शक्य होणार नाही.

४) दिनांक ३०.०८.२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत त्याचप्रमाणे सन २०२४-२०२५ चा वैधानिक हिशेब तपासनीसांचा अहवाल व सन २०२३-२०२४ चा वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवाल सभासदांच्या अवलोकनार्थ दिनांक १५.०९.२०२५ पासून कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात येईल. तसेच बँकेच्या सर्व शाखांमध्ये मागील सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती दिनांक १५.०९.२०२५ पासून सभासदांच्या अवलोकनासाठी कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील.

५) ज्या सभासदांनी त्यांचा ई-मेल आय.डी. किंवा मोबाईल क्रमांकाची बँकेकडे नोंद केली नसेल त्यांनी त्याबाबतची माहिती संबंधीत शाखा कार्यालयात अद्ययावत करण्यात यावी.

६) बँकेच्या www.municipalbankmumbai.com या वेबसाईटवर ७३ वा वार्षिक अहवाल सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात येईल.

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

मुंबई, दिनांक : १७/०९/२०२५

७३ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ७३ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सन्माननीय संचालक मंडळाच्या वतीने आपल्यापुढे सादर करण्यास मला आनंद होत आहे.

सन २०२४-२०२५ मध्ये बँकेने आर्थिक दृष्ट्या सर्वांगीण प्रगती साधली आहे. यावर्षी बँकेला रुपये ११२.२८ कोटी इतका ढोबळ नफा झाला असून त्यावर आयकरापोटी रुपये ३३.५९ कोटी अधिदान/तरतूद करुन बँकेस रुपये ७८.६९ कोटी इतका निव्वळ नफा झाला आहे. अहवाल सालामध्ये बँकेने केलेल्या प्रगतीचा गोषवारा पुढीलप्रमाणे :-

१. अहवाल सालातील ठळक वैशिष्टये :

खाली नमूद केलेल्या तक्त्यावरुन बँकेने अहवाल वर्षात केलेल्या कामगिरीची कल्पना येते :-

(रुपये कोटीत)

अ.क्र.	तपशील	आर्थिक वर्ष ३१.०३.२०२४ अखेरची रक्कम	आर्थिक वर्ष ३१.०३.२०२५ अखेरची रक्कम	निव्वळ वाढ (+)/ घट (-)
१.	भाग भांडवल	१३९.३१	१५४.११	+१४.८०
२.	ठेवी	४२५७.६२	४३८४.५५	+ १२६.९३
३.	कर्जे	३०७१.७५	३१२३.२१	+५१.४६
४.	खेळते भांडवल	५८०५.०५	५७१९.९३	-८५.१२
५.	आयकर भरण्यापूर्वीचा नफा	१०७.१२	११२.२८	+ ५.१६
६.	आयकर भरल्यानंतरचा निव्वळ नफा	७६.४५	७८.६९	+ २.२४

अहवाल सालामध्ये बँकेचे भाग भांडवल रुपये १५४.११ कोटी इतके झाले असून गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी यामध्ये रुपये १४.८० कोटीने वाढ झाली आहे. बहुतांश सभासद सेवानिवृत्त होतात मात्र महापालिकेत नव्याने नियुक्त होणा-या कर्मचारी / अधिकारी यांचे प्रमाण कमी असल्याकारणाने तसेच काही सभासदांनी इतर विविध कारणांमुळे बँकेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिल्याने सभासद संख्या कमी झाली आहे. भाग भांडवलामध्ये वाढ व्हावी, या उद्देशाने दि.०१-०४-२०२४ पासून महत्तम भाग भांडवल मर्यादा रु.२५,००० /- वरुन रु.३५,०००/- करण्यात आली होती. यामुळे गत वर्षात भाग भांडवलात रुपये १४.८० कोटीने वाढ झाली. गतसाली बँकेच्या ठेवी रुपये ४२५७.६२ कोटी इतक्या होत्या. यावर्षी सदर ठेवी रुपये ४३८४.५५ कोटी इतक्या आहेत म्हणजेच गेल्या वर्षाच्या तुलनेत रुपये १२६.९३ कोटीने ठेवींमध्ये वाढ झाली आहे.

यावर्षी आपल्या बँकेचे ३००८ सभासद सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर सर्वसाधारणपणे सभासद त्यांच्या जन्मगावी/मूळगांवी राहणे पसंत करतात. त्यामुळे अशा सभासदांची सक्तीची ठेव व इतर ठेवी मोठया प्रमाणात कमी होतात. तसेच काही सभासद सेवानिवृत्तीनंतर महापालिकेकडून मिळणारी रक्कम आपल्या बँकेत ठेव स्वरुपात ठेवतात. तसेच काही सभासद त्यांचे पेन्शन खाते आपल्या बँकेत उघडून सेवानिवृत्तीनंतरही बँकेबरोबर ऋणानुबंध कायम ठेवतात.

गतवर्षी रुपये ३०७१.७५ कोटी असलेली कर्जे यावर्षी रुपये ३१२३.२१ कोटी झाली आहेत. सदर कर्जात रुपये ५१.४६ कोटी (१.६८ टक्के) इतकी वाढ झाली आहे. सर्वसाधारणपणे बँकेचा सी.डी. रेशो ६० ते ७० टक्केपर्यंत असणे आवश्यक आहे. सदर रेशो हा बँकेच्या ठेवी, कर्जे, निधी यांच्याशी निगडीत असतो. दिनांक ३१.०३.२०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बँकेचा सी.डी. रेशो ७१.२३ टक्के आहे.

मागील वर्षी रुपये ५८०५.०५ कोटी असलेले खेळते भांडवल यावर्षी रुपये ५७१९.९३ कोटी झाले आहे. म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत खेळत्या भांडवलामध्ये रुपये ८५.१२ कोटी इतकी घट झाली आहे. सदर घट १.४७ टक्के आहे. आर्थिक वर्षात कर्ज रकमेत रुपये

५१.४६ कोटी वाढ झाली आहे. कर्ज रकमेत वाढ झाल्याने कर्जावरील व्याज रकमेत रुपये १०.३५ कोटीने वाढ झाली आहे. गतवर्षी बँकेस रुपये १०७.१२ कोटी ढोबळ नफा झाला होता. मात्र यावर्षी सदर ढोबळ नफा रुपये ११२.२८ कोटी झाल्याने नफ्यामध्ये गतवर्षीपेक्षा रुपये ५.१६ कोटीची म्हणजेच ४.८२ टक्के वाढ दिसत आहे. यावर्षी बँकेस आयकर भरल्यानंतर निव्वळ नफ्यामध्ये रुपये २.२४ कोटीने म्हणजेच २.९३ टक्केने वाढ दिसत आहे. आयकर कायदा १९६१ मधील ११५ बी.ए.डी. कलम अंतर्गत आर्थिक वर्ष २०२०-२१ पासून सहकारी संस्थांना ३०% (अधिभार व उपकरांसह ३४.९४%) आयकराऐवजी मूळ २२% (अधिभार व उपकरांसह २५.१७%) आयकर लागू झाल्याने बँकेने सदर कलमांतर्गत मागील आर्थिक वर्षापासून आयकर दायित्व स्विकारले आहे. मात्र सदर कलम स्विकारल्यास भविष्यात त्यात माघार घेता येणार नाही. तसेच विविध वजावटी व सवलतींचा लाभ मिळणार नाही. आपल्या बँकेला काही ठराविक बाबींसाठीच आयकर विवरण भरताना वजावटी मिळत असल्याने सदर पर्याय अवलंबिलेला आहे. त्याचा फायदा बँकेस होत आहे.

(१.१) सभासद :

अहवाल वर्ष अखेर बँकेची सभासद संख्या ६८७४० इतकी झाली आहे. गतसाली ही संख्या ७१०१३ होती. अहवाल वर्षात ४५७८ सभासद कमी झाले असून बँकेच्या परिवारात २३०५ सभासद नव्याने सामील झाले आहेत. महापालिकेत नव्याने कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची नेमणूक सध्या होत नसल्याने नवीन सभासदांची संख्या जास्त वाढत नाही. सभासद नसलेल्या महापालिका कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना सभासद करुन घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच नवीन होणाऱ्या सभासदाची एक सक्तीची ठेव प्राप्त झाल्यावर परतावा क्षमतेनुसार काही विशिष्ट कर्ज सुविधा वगळून इतर सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेमध्ये नव्याने भरती होणाऱ्या सभासदास आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज घेणे खूप सोयीचे होत आहे.

(१.२) संगणकीकरण :

- **एस.एम.एस. अलर्ट सेवा :**

  खातेदारांच्या खात्यावर व्यवहार झाल्यावर सदर व्यवहाराची त्वरीत माहिती खातेदारास प्राप्त व्हावी म्हणून भ्रमणध्वनीवर एस.एम.एस. अलर्ट सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सर्व सभासद/ग्राहकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या भ्रमणध्वनी क्रमांकात बदल झाल्यास त्याची त्वरीत नोंद बँकेच्या दफ्तरी करण्यात यावी जेणेकरुन खात्यातील व्यवहाराची माहिती तात्काळ मिळणे शक्य होईल.

- **कर्ज अर्ज आज्ञाप्रणाली**

  बँकेने नविन लायसन्स आधारीत सी बी एस आज्ञाप्रणाली वर स्थलांतर केले आहे. या आज्ञाप्रणालीमध्ये सुध्दा पुर्वीप्रमाणेच कर्ज घेणाऱ्या सभासदांसाठी त्यांचे कर्जाचे अर्ज संगणकामार्फत भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ज्याद्वारे सभासदाला त्यांच्या कर्ज अर्जाबाबतची माहिती छापील स्वरूपात प्राप्त होते. सदर सुविधेचा लाभ सर्व सभासदांना होत आहे. विशेषत: अशिक्षित सभासदांना जास्त लाभ होत आहे. तसेच या आज्ञाप्रणालीमुळे कर्ज अर्जाची छाननी जलदगतीने होण्यास मदत होत असून त्याचा लाभ सभासदांस होत आहे. सदर सुविधेमुळे सभासदास कर्ज मिळणेबाबतची माहितीही जलदगतीने देणे शक्य झाले आहे.

- **व्यक्तिगत नावाचे धनादेश सुविधा :**

  ग्राहकांना व्यक्तिगत/खात्याचे नाव असलेले धनादेश पुस्तिका (Personalised Cheque Book) केंद्रीय पध्दतीने देण्याची सुविधा उपलब्ध आहे.

- **MPLS Link / Airtel Link :**

  सभासदांना जलदगतीने व अखंडीत सेवा देण्यासाठी बँकेने भारती एअरटेल यांच्याकडून एस.डी.वॅन (SD-WAN) टेक्नॉलॉजी आधारीत प्रायमरी व बॅकअप लिंक घेतलेली असून शाखा स्तरावर सदर लिंक स्थापित केली आहे. आस्थापना विभागाकरीता आवश्यक आज्ञाप्रणाली, स्वत:चे ई-मेल सोल्युशन सुविधा सुरु आहे. ग्राहकांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे ई-मेल आय.डी. शाखेमध्ये जाऊन खात्यामध्ये नोंदवावेत जेणेकरुन खात्याविषयी सर्व माहिती, तक्रार निवारण इत्यादी बँकेला जलद व सुलभरित्या पोहोचविणे शक्य होईल व ग्राहकांचा अमूल्य वेळ वाचेल. आधुनिक तंत्रज्ञानासह अद्ययावत सेवा देण्यास बँक प्रयत्नशील आहे.

- **बँकेची वेबसाईट :**

  बँकेने स्वत:ची www.municipalbankmumbai.com ही वेबसाईट आकर्षक व अत्याधुनिक स्वरुपात अद्ययावत केलेली असून सदर वेबसाईटवर कर्ज नियम, कर्जाचे व ठेवींचे व्याज दर, संचालक मंडळ, स्वास्थ्य निधी नियम, बँकेची आर्थिक स्थिती, बँकेमध्ये होणारे बदल, निविदा सूचना, कर्मचारी/अधिकारी भरती प्रक्रियांचा तपशील इत्यादी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तसेच एन. पी.सी.आय. मार्फत रुपे डेबिट कार्डावर विविध प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. त्या संदर्भाची माहिती देखील वेबसाईटवर

उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरी सभासदांनी जास्तीत जास्त रूपे कार्डचा वापर करुन सदर सुविधांचा लाभ घ्यावा. सध्या नवीन ग्राहक तक्रार निवारण सुविधा बँकेने वेबसाईटवर उपलब्ध करुन दिली आहे, ज्याद्वारे ग्राहक आपली तक्रार तात्काळ बँकेकडे नोंद करु शकतात.

- **KIOSK मशिनची स्थापना :**

बँकेतील बचत खातेदारांसाठी बारकोड आधारीत पासबुक किऑस्क मशिनची सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर सुविधेअंतर्गत बँकेतील मुख्य कार्यालय शाखा, सी.एस.टी., नानाचौक, भायखळा, परळ, बांद्रा, घाटकोपर, मुलूंड, देवनार, जी/साऊथ, अंधेरी (पश्चिम), सायन, कांदिवली, बोरीवली, जी/नॉर्थ, चेंबूर अशा प्रमुख १६ शाखांमध्ये बारकोड किऑस्क मशिनची स्थापना करण्यात आली असून सदर सुविधेअंतर्गत बारकोड हे खाते क्रमांकाशी संलग्न केल्यानंतर सदर खातेदार पासबुक थेट मशिनवर स्वत: अद्ययावत करतात. तरी सर्व सभासदांनी बारकोड असलेली पासबुके बँकेच्या नजिकच्या शाखेत संपर्क साधून अद्ययावत करुन घ्यावीत.

(१.३) Central Know Your Customer (C-KYC): बँकेने रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार सी-केवायसी आज्ञाप्रणाली अद्ययावत केली आहे ज्याद्वारे नवीन सभासदांचे खाते उघडताना त्यांनी सादर केलेले के.वाय.सी. ओळखपत्रांची माहिती थेट सी-केवायसी आज्ञाप्रणालीद्वारे CERSAI पोर्टलवर लोड करण्यात येते व ती अधिकृत झाल्यानंतर युनिक सी-केवायसी क्रमांक बँकेस प्राप्त होतो. सदर सुविधा बँकेने कार्यान्वित केली आहे.

(१.४) डॉरमेंट अकाऊंट आणि इन-ऑपरेटिव्ह अकाऊंट : बचत खात्यात एक वर्ष कोणत्याही प्रकारचे ग्राहकप्रेरीत (Customer Induced) व्यवहार न केल्यास सदर खाते इन-ऑपरेटिव्ह होते. तसेच २ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी ग्राहकप्रेरीत (Customer Induced) व्यवहार न केल्यास खाते डॉरमेंट होते. अशी खाती पूर्ववत करण्यासाठी सभासदास त्याचे खाते असलेल्या शाखेत जाऊन के.वाय.सी. ची पूर्तता करणे आवश्यक आहे व काही रकमेचे व्यवहार स्वत: सभासदाने केल्यानंतरच सदर खाते हे पूर्ववत होते. तरी उपरोक्त गैरसोय टाळण्यासाठी सभासदांनी वेळोवेळी बचत खात्यात डेबीट व्यवहार करावेत.

(१.५) National Payment Corporation of India (NPCI) : एन.पी.सी.आय. द्वारे भारतात अंमलात असलेल्या व भविष्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या अधिदान पध्दतीत सुसूत्रता आणण्याच्या हेतूने एन.पी.सी.आय. ची स्थापना झाली असून, भारतातील सर्व बँकांनी त्यांचे सभासदत्व स्विकारले असून आपल्या बँकेने देखील एन.पी.सी.आय.चे थेट सभासदत्व स्विकारले आहे. एन.पी.सी.आय.द्वारे राबविण्यात येणा-या विविध सेवा-सुविधा बँक सभासद/ग्राहकांपर्यंत थेट पोहोचवित आहे.

(१.६) ए.टी.एम. सेवा रुपे कार्डशी संलग्नित : आपली बँक रुपे कार्डची सभासद असल्यामुळे बऱ्याच सभासदांना याचा फायदा झाला आहे. एटीएम व्यवहारास प्रोत्साहन देण्यासाठी बँकेने खातेदारांना २४ तास रोख रक्कम काढण्याची सेवा देण्यासाठी बँकेच्या मुलुंड, सायन, भायखळा, बांद्रा, परळ, बोरीवली, नायर हॉस्पिटल, चेंबूर या आठ शाखांमध्ये तसेच वरळी इंजिनिअरींग हब व कापूरबावडी, ठाणे येथे बँकेची ए.टी.एम्. स्थापित केलेली आहेत. सदर सुविधेअंतर्गत ग्राहक ए.टी.एम. वर रुपये २५०००/- पर्यंत व्यवहार करु शकतात. त्यामुळे बँकेचा ग्राहक भारतातील एन्.पी.सी.आय्.शी (रुपे) संलग्न असलेल्या सुमारे २.५५ लाख ए.टी.एम्.द्वारे व्यवहार करु शकतील. बँक कॉन्टॅक्टलेस कार्ड ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देणार आहे व त्याकरीता प्रक्रिया सुरु आहे. अहवाल वर्षात बँकेने बी विभाग कार्यालय व बँकेच्या देवनार शाखेत ATM स्थापित केले आहे. तसेच अहवाल वर्षात सी. एस. टी. शाखा एटीएम तसेच घाटकोपर यार्ड येथे एटीएम केंद्रे स्थापित करण्याचे योजिले असून सदर विभागीय कार्यालयात जागा उपलब्ध करून देण्याकरीता पाठपुरावा सुरू आहे.

- बँकेने ग्राहकांसाठी एन्.पी.सी.आय्.ची E-Commerce सुविधा सुरु केली असून सदर सुविधेअंतर्गत बँकेतील ग्राहक त्यांचे भ्रमणध्वनी/टेलिफोन, गॅस, वीज देयके भरणे इत्यादी तसेच इतर ऑनलाईन व्यवहार करु शकतात. सदर व्यवहारामध्ये यावर्षी लक्षणीय वाढ झाली आहे.
- पॉस सुविधा (Point of Sale) - आपल्या ग्राहकाला डेबीट कार्डद्वारे भारतातील कोणत्याही आस्थापनेमधून रोखविरहीत व्यवहार करणे शक्य व्हावे म्हणून एन.पी.सी.आय. च्या सहकार्याने बँकेने पॉस सुविधा ग्राहकांना उपलब्ध केलेली आहे. आपला ग्राहक डेबीट कार्डद्वारे भारतात कोठेही आस्थापनामध्ये (पेट्रोल पंपासहीत) टर्मिनल्सद्वारे रोखविरहीत व्यवहार करु शकतात. पॉस आणि ई-कॉम एकत्रितपणे ५०,००० पर्यंत व्यवहार करता येतो.

(१.७) बँकेद्वारा पुरविण्यात येणा-या अधिदानासंदर्भातील (Payment System) विविध सुविधा:

- **Cheque Truncation System (C.T.S) :** भारतीय रिझर्व्ह बँकेने सी.टी.एस. २०१० या प्रणालीअंतर्गत बँकेच्या ग्राहकांकडून जे धनादेश (Cheques) समाशोधनासाठी (Clearing) रिझर्व्ह बँकेत पाठविले जातात त्याऐवजी धनादेशाची प्रतिकृती (Image) संगणक आज्ञाप्रणालीद्वारे पाठविली जाते व प्रत्यक्ष धनादेश बँकेकडेच राहतात व मानवी हस्तक्षेप ब-याच प्रमाणात कमी झाल्याने समाशोधन जलद

गतीने होते. त्यानुसार बँकेने ग्राहकांसाठी सी.टी.एस. २०१० प्रणालीद्वारे धनादेश ग्राहकांना उपलब्ध करुन दिले आहेत. भारतीय रिझर्व्ह बँक, सर्व बँकांसाठी नविन कार्यप्रणाली "Positive pay System for Cheque Truncation System" अंमलात आणली आहे. सदर योजना ही रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या धनादेशासाठी आहे. रुपये ५,००,०००/- पेक्षा कमी रकमेच्या धनादेशाची माहिती बँकांना पुरविणे हे ग्राहकांसाठी ऐच्छिक असेल, परंतु रुपये ५,००,०००/- व त्यावरील रकमेसाठी धनादेशाचा तपशील बँकेस कळविणे अनिवार्य आहे.

- **National Automated Clearing House (NACH)** : बँकेने सदर सुविधा कार्यान्वित केली असून ई.सी.एस. प्रणालीप्रमाणे त्यांची कार्यशैली असून त्याअंतर्गत ग्राहकांना सध्या गॅस सबसिडी तसेच इतर देयके प्राप्त होतात. ग्राहक उपरोक्त सुविधेअंतर्गत इतर ठिकाणी असलेली कर्ज रक्कम, म्युच्युअल फंड गुंतवणूक, वीज व इतर देयक नियमितपणे पाठवू शकतात. तरी सदरबाबतचा मॅनडेट अर्ज भरताना खातेदारांनी आपले खाते क्रमांक, नाव व बँकेचा तपशील अचूक व काळजीपुर्वक नमूद करावा. तसेच एन.पी.सी.आय. या संस्थेने आता NACH या कार्यप्रणालीमध्ये H2H (Host to Host) या कार्यप्रणालीचा अवलंब केल्यामुळे मानवी हस्तक्षेप पूर्णत: बंद झाला आहे. H2H कार्यप्रणालीमुळे मोठया प्रमाणात व्यवहारांची अखंडीत पुर्तता करणे शक्य झाले आहे.

- **E mandate** : बँकेने ई- मॅन्डेटसुविधा ग्राहकांसाठी सुरू केली असून सदर सुविधेद्वारे ग्राहक आपला बचत खात्यावरील ठरावीक रक्कम वेळोवेळी वसूल करण्यासाठी परवानगी देतो. सदर सुविधा मुख्यत: विमा प्रीमियम, कर्ज हफ्ते, बिल देयके यांकरीता उपयुक्त ठरते.

- **NEFT (24 X 7) :** बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार एन.ई.एफ.टी. ची सुविधा खातेदारांना २४ X ७ आणि ३६५ दिवस अहोरात्र उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर सुविधेवर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येत नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या इफ्टास ह्या संस्थेच्या क्लाऊड सेटअपवर स्थलांतरीत केलेले आहे व त्याचा फायदा बँकेला / ग्राहकांना होत आहे.

- **मोबाईल बँकींग/आय.एम.पी.एस. (IMPS) सुविधा :**

  बँकेत मोबाईल बँकींग सुविधा कार्यान्वित असून सदर सुविधेअंतर्गत बँकेच्या खातेदाराला बँकेच्या मोबाईल ॲपद्वारे स्वत:च्या खात्यावरील रक्कम आपल्या बँकेच्या तसेच अन्य बँकेच्या दुस-या खातेदाराच्या खात्यात एन.ई.एफ.टी./आय.एम.पी.एस. द्वारे ट्रान्सफर करता येते. याचबरोबर इतर बँकेतील ग्राहक आपल्या बँकेतील ग्राहकांच्या नावे रक्कम थेट ट्रान्सफर करु शकतात. तसेच इतर देयके सुध्दा भरता येतात. उपरोक्त सुविधेद्वारे बँकेच्या खातेदाराना आपल्या खात्यावरील शिल्लक रकमेची माहिती पाहता येते. मागील ६ महिन्यांपर्यंतचा खात्याचा तपशील सुध्दा मोबाईल बँकींगद्वारे उपलब्ध होतो. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार खातेदारांना त्यांचे ए.टी.एम. कार्ड, मोबाईल ॲपद्वारे ब्लॉक करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

  मोबाईल ॲप्लिकेशन ॲप नविन सुविधांसह अद्ययावत करण्यात आला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार ॲपला अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीकोनातून डिव्हाईस बाईंडींगचा समावेश करण्यात आला आहे. सदर अद्ययावत ॲप्लिकेशनमध्ये कार्ड कंट्रोल मेजर्सचा अंतर्भाव करण्यात आला आहे जेणेकरुन स्वत: युजर मोबाईल बँकींग ॲप्लिकेशनद्वारे स्वत:च्या ए.टी.एम./ई-कॉम/पॉस व्यवहाराच्या मर्यादेमध्ये बदल करु शकेल. तसेच सायबर अफरातफर होऊ नये, याची दक्षता म्हणून वापरात नसलेली सुविधा ग्राहक स्वत: तात्पुरत्या स्वरूपात बंद करु शकतील तसेच सदर ॲपद्वारे धनादेश पुस्तिका मागणी नोंदवू शकतात.

- **Unified Payment Interface (UPI) :** बँकेत एन.पी.सी.आय. ची यु.पी.आय. सेवा बँकेच्या ग्राहकांसाठी कार्यान्वित केली असून सदर सेवेअंतर्गत बाजारात उपलब्ध असलेल्या गुगल-पे, फोन-पे यासारख्या ॲपवर आपल्या बचत खात्यावरील नोंदणीकृत मोबाईल नंबरवरुन आपले बचत खाते सदर ॲपशी संलग्न करु शकतात व कोणताही व्यवहार करु शकतात. UPI ची प्रतिदिन मर्यादा रू.५०,०००/आहे. एन.पी.सी.आय. च्या मार्गदर्शक तत्वानुसार बँक सध्या यु.पी.आय. आज्ञाप्रणालीमध्ये UDIR (Unified Dispute and Issue Resolution) समावेश करीत आहे जेणेकरुन ग्राहकाचे अयशस्वी व्यवहाराची तक्रार त्वरीत नोंदवून त्याबाबतची स्थिती ग्राहकाला अवगत होऊ शकते. परंतु अशा प्रकारचे व्यवहार करताना ग्राहकांनी योग्य ती काळजी घ्यावी. उदा. आपली बँक कधीही दूरध्वनी करुन आपणांस आपल्या OTP, Card Expiry date, Card No. ची विचारणा करीत नाही. तरी अशा प्रकारची माहिती कोणालाही देऊ नये. **अज्ञात व संशयास्पद एस.एम.एस. किंवा लिंकवर क्लिक करु नये आणि सर्वात महत्वाचे UPI Pin कोणालाही देऊ नये.** या सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन केले तर होणारी फसवेगिरी आपण टाळू शकाल. कोणत्याही प्रकारचे डिजिटल व्यवहार करताना ग्राहकांनी नेहमी सतर्क व जागरुक रहावे.

- **Contineous Clearing:** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी जारी केलेला सतत समाशोधन (Contineous Clearing) परिपत्रकानुसार बँकेने सर्व तांत्रिक आणि प्रक्रियात्मक तयारी पुर्ण केलेली असल्यामुळे बँक सतत समाशोधन (Contineous Clearing) प्रक्रियेसाठी पूर्णपणे सक्षम आहे.

(१.८) सी.बी.एस. : बँकेने ग्राहकांना अधिक चांगली व अद्ययावत सेवा देण्याच्या उद्देशाने नविन लायसन्स आधारीत सी.बी.एस व त्या अनुषंगाने आवश्यक असलेले डेटा सेन्टर /डेटा रिकव्हरी साईट यांची स्थापना करून डिजिटल चॅनल सेवेसह दिनांक ३०/१०/२०२३ रोजी जॉइंट स्थलांतर केले आहे. सदर सी.बी.एस आज्ञाप्रणाली मध्ये ए.एम.एल. / एल.ओ.एस. व लॉकर मॉडयुलचा समावेश केला आहे.

- **मिस्ड कॉल अलर्ट सुविधा :** बँकेने आपल्या ग्राहकांसाठी मिस्ड कॉल अलर्ट सेवा सुरु केली असून सदर सुविधेअंतर्गत बँकेचे खातेदार आपल्या बचत खात्यावरील नोंदणीकृत मोबाईलवरुन ८०८०९४२६७६ या क्रमांकास मिस्ड कॉल दिल्यास त्वरीत त्यांना आपल्या बचत खात्यावरील शिल्लक रक्कम एस.एम.एस. च्या माध्यमातून कळू शकेल.
- **सायबर इन्शुरन्स :** रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार बँकेने स्वत:ची सायबर सिक्युरिटी पॉलिसी तयार केली असून सायबर हल्ल्यापासून उद्भवणाऱ्या धोक्यापासून सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून बँकेने रुपये ११ कोटी रकमेची सायबर विमा पॉलिसी देखील घेतलेली आहे.
- **ए.टी.एम. कार्ड इन्शुरन्स :** ए.टी.एम कार्डचा गैरवापर करुन होणाऱ्या गैरव्यवहारापासून होणाऱ्या आर्थिक नुकसानाची भरपाई व्हावी, या अनुषंगाने बँकेने खबरदारीचा उपाय म्हणून ए.टी.एम.-कम-डेबीट कार्डासाठी विमा पॉलिसी घेतलेली आहे.
- **ए.टी.एम. गैरव्यवहार/यु.पी.आय.तक्रार निवारण :** ग्राहकांच्या ए.टी.एम. कार्डद्वारे होणा-या गैरव्यवहार प्रकरणांबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व बँकेच्या अंतर्गत ग्राहक निवारण धोरणाअंतर्गत गैरव्यवहार तक्रार निवारणासंबंधीत कार्यपध्दती बँकेत राबविण्यात येत आहे, खातेदाराने गैरव्यवहार झाल्यापासून ३ दिवसांच्या आत तक्रार बँकेकडे नोंदविल्यास संपूर्ण रक्कम अदा करण्याची बँकेची जबाबदारी राहते. खातेदाराने जर तक्रार ४ ते ७ दिवसांत बँकेकडे नोंदविल्यास, व्यवहार रक्कम रुपये १०,०००/- पेक्षा जास्त असल्यास उर्वरित रक्कम बँक अदा करेल व रुपये १०,०००/- पर्यंत रकमेची जबाबदारी खातेदाराची राहील. खातेदाराने ७ दिवसानंतर तक्रार नोंदविल्यास, अनधिकृत व्यवहाराची रक्कम रुपये २०,०००/- पर्यंत असल्यास त्यापैकी रुपये १०,०००/- पर्यंत रक्कम ही ग्राहकाची जबाबदारी राहील व रुपये १०,०००/- वरील रक्कम बँक अदा करेल. त्याचप्रमाणे अनधिकृत व्यवहाराची रक्कम ही रुपये २०,०००/- पेक्षा जास्त असल्यास त्यापैकी ५० टक्के रक्कम बँक अदा करेल.

(१.९) पंतप्रधान सुरक्षा विमा योजना/पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना :

ज्या सभासद/ठेवीदारांनी सदर योजनेचा लाभ घेतला असेल त्या सभासदांनी/ठेवीदारांनी प्रतिवर्ष विमा हप्ता रकमेचे नुतनीकरण करावे. तसेच ज्या सभासदांनी/ठेवीदारांनी सदर सुविधा घेतली आहे त्यांनी प्रतिवर्षी मे महिन्याच्या अखेरच्या आठवडयात विमा हफ्त्याएवढी रक्कम शिल्लक खात्यात ठेवावी.

(१.१०) बँकेच्या मुख्य कार्यालयाची संरचना दुरुस्ती व शाखा नुतनीकरण :

बँकेची मुख्य कार्यालय इमारत मुंबई पोर्ट ट्रस्ट प्राधिकरणाकडून लीज धर्तीवर खरेदी करण्यात आली होती. सदर लीज कालावधी दिनांक ३१/०३/२०२४ रोजी संपुष्टात आला असून, लीज कालावधी नूतनीकरणाकरीता मुंबई पोर्ट ट्रस्ट प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. बँकेची बांद्रा शाखास्थित इमारत स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टनुसार धोकादायक घोषित केल्याने, बँकेने सदर शाखा कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात बँकेच्या जी/नॉर्थ शाखेत स्थलांतरीत केली आहे. बांद्रा शाखा कार्यालयाकरीता पर्यायी जागा मिळण्याकरीता पत्रव्यवहार करण्यात आला असून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

अहवाल वर्षात मनपा टी विभाग कार्यालय स्ट्रक्चरल दुरुस्तीच्या अनुषंगाने तसेच मुलुंड शाखा कार्यालयाच्या नूतनीकरणाकरीता सदर शाखा महापालिका 'टी' विभाग कार्यालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात आली आहे. तसेच महापालिका 'एस' विभाग कार्यालयस्थित बँकेची भांडूप शाखा, विभाग कार्यालय स्ट्रक्चरल दुरुस्तीच्या अनुषंगाने तसेच भांडूप शाखा कार्यालयाच्या नूतनीकरणाकरीता तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी जागेत ''न्यू केशव सृष्टी बिल्डिंग नं. १, एल. बी. एस. मार्ग, भांडूप (पश्चिम)'' येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे. विभाग कार्यालय स्ट्रक्चरल दुरुस्तीअंती भांडुप शाखेच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. बँकेची मरीन लाईन्स शाखा तात्पुरत्या स्वरूपात सोमणबिल्डिंग जगन्नाथ शंकरशेट मार्ग, गिरगांव येथील बँकेच्या जागेमध्ये स्थलांतरीत असून सदर शाखास्थित इमारत स्ट्रकचरल ऑडिट रिपोर्टनुसार धोकादायक (सी. १ श्रेणीत) असल्याने बँकेची जागा रिक्त करण्याबाबतची नोटीस कार्यकारी अभियंता / डी १ विभाग, एम.बी. आर.अँड आर. बोर्ड (म्हाडा) यांचेकडून जारी करण्यात आली आहे. त्यानुसार सदर शाखा तात्पुरत्या स्वरूपात बँकेच्या मुख्य कार्यालय शाखेत स्थलांतरीत करण्यात आली आहे.

महापालिका घाटकोपर यार्ड, के.ई.एम. रुग्णालय (सी व्ही टी सी इमारत) आणि महापालिका मुख्यालयस्थित सी. एस. टी.शाखा या ठिकाणी ए.टी. एम. केंद्र स्थापीत करण्याकरीता भारतीय रिझर्व्ह बँकेची परवानगी प्राप्त झाली आहे.

महापालिका घाटकोपर यार्ड आणि के.ई.एम.रुग्णालय (सी व्ही टी सी इमारत) आवारात ए.टी.एम. केंद्राकरिता जागा प्राप्त करण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला असून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. सी. एस. टी. शाखा येथे देखील लवकर एटीएम केंद्र कार्यान्वित करण्यात येईल.

(१.११) महापालिका कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतन/पेन्शन वितरणाचे काम :

महापालिका तसेच अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांच्या कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन तसेच महापालिकेच्या निवृत्ती वेतनधारकांचे पेन्शन वाटप बचत खात्याद्वारे करण्यात येत आहे. साधारणपणे ५०,००० कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन वितरणाचे/पेन्शन सुविधेचे काम बँकेतर्फे केले जाते. सदर वेतन/पेन्शन वाटप महापालिकेकडून कोणतेही शुल्क न घेता केले जाते. बँकेच्या सर्व शाखा कार्यालयांमध्ये कोअर बँकींग सुविधा उपलब्ध असल्याने वेतन/पेन्शन वाटपाचे काम सुलभपणे होत असून सभासद/ग्राहक कोणत्याही शाखेतून बचत खात्यामार्फत आपल्या मासिक वेतन/पेन्शनचे पैसे काढू शकतात व ए.टी.एम. सेवा सर्व बँकांशी संलग्न असल्यामुळे सभासदांना रोख व्यवहार करणे आणखी सुलभ झाले आहे व घराजवळील कोणत्याही बँकांच्या ए.टी.एम. मधून पैसे काढणे शक्य झाले आहे. आपल्या ज्या सभासदांची वेतनाची बचत खाती अन्य बँकेत आहेत त्या सर्व सभासदांना आम्ही विनम्र आवाहन करतो की, त्यांनी आपले वेतनाचे बचत खाते तसेच सेवानिवृत्ती नंतर पेन्शन खाते आपल्या बँकेत उघडावे व ए.टी.एम. कार्डद्वारे आपल्या घराजवळील कोणत्याही ए.टी.एम. मधून व मोबाईल बँकींग ॲपद्वारे जोखीमरहीत व्यवहार करावेत.

२. अहवाल वर्षातील बँकेच्या व्यवहाराची प्रगती :

दिनांक ३१ मार्च २०२५ च्या ताळेबंदाचा गोषवारा

(रुपये कोटीत)

तपशील	३१.३.२०२४	३१.३.२०२५	तपशील	३१.३.२०२४	३१.३.२०२५
भाग भांडवल	१३९.३१	१५४.११	रोकड, इतर बँकातील जमा	२८७.०९	२९७.१०
राखीव निधी व इतर निधी	७२५.४९	७९१.८८	कर्जरोख्यात व इतर गुंतवणूक	२०१९.००	२१५०.३१
ठेवी	४२५७.६२	४३८४.५५	कर्जे	३०७१.७५	३१२३.२१
इतर देणी आणि तरतूद (दुबेरजेसहीत)	५४१.४७	२४३.४०	व्याज येणे	३८.१७	४८.२५
मागील वर्षाच्या जादा तरतूदीसह नफा	१४१.१६	१४५.९८	फर्निचर, इमारत, संगणक व वाहन	४.६९	४.०१
--			डिफर टॅक्स येणे	२९.४४	३२.०९
--			इतर येणी (दुबेरजेसहीत)	३५४.९१	६४.९५
एकूण :	**५८०५.०५**	**५७१९.९२**	**एकूण :**	**५८०५.०५**	**५७१९.९२**

३. ठेवींची वर्गवारी :

(रुपये कोटीत)

		३१ मार्च २०२४			३१ मार्च २०२५		
अ. क्र.	ठेवींचे प्रकार	सभासदांकडून	बिगर सभासदांकडून	एकूण	सभासदांकडून	बिगर सभासदांकडून	एकूण
१.	सक्तीच्या ठेवी	१०८४.१०	२७.६०	१११९.७०	९८९.८८	२३.७४	१०१३.६२
२.	मुदतीच्या ठेवी	११०.७६	२००५.०७	२११५.८३	२०१.४३	२००४.३२	२२०५.७५
३.	बचत ठेवी	५४८.९२	४६१.३५	१०१०.२७	५६७.७४	५७७.६४	११४५.३८
४.	आवर्त ठेवी	४.९६	१०.८५	१५.८१	६.९८	७.८८	१४.८६
५.	चालू ठेवी	०.००	४.०१	४.०१	०.००	४.९४	४.९४
	एकूण	**१७४८.७४**	**२५०८.८८**	**४२५७.६२**	**१७६६.०३**	**२६१८.५२**	**४३८४.५५**

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता निदर्शनास येते की, अहवाल सालामध्ये बँकेच्या एकूण ठेवीमध्ये रुपये १२६.९३ कोटीने वाढ झाली आहे. प्रामुख्याने अहवाल साली बचत ठेवीमध्ये रुपये १३५.१२ कोटी म्हणजेच १३.३७ टक्केने वाढ झाली आहे. बँकेच्या ठेवींवरील व्याज दर राष्ट्रीयकृत व खाजगी बँकेच्या ठेवीदारांइतका आहे. यावर्षी बँकेने सक्तीच्या ठेवीवरील व्याज दिनांक ३१.०३.२०२५ रोजी सभासदांच्या बँकेतील बचत खात्यात जमा केलेले आहे. गतवर्षी बँकेने सदर व्याज दि. ०१.०४.२०२४ रोजी जमा केले होते.

सूचना :- जे सभासद सक्तीच्या ठेवीवरील व्याज आपल्या सक्तीच्या ठेव खात्यात जमा करु इच्छितात, अशा सभासदांनी बँकेस पत्र दिल्यास त्यांचे व्याज सक्तीच्या ठेव खात्यात जमा करण्यात येईल. ज्यांनी सदर खाते कार्यान्वित (ॲक्टीव्ह) केले नाही त्यांनी त्यांची के.वाय.सी. कागदपत्रे सादर करुन सदर खाते कार्यान्वित करावे, जेणेकरुन लाभांश रक्कम अधिदान करणे शक्य होईल.

ठेवींचे व्याज दर :

बँकेचे सद्याचे दिनांक ०१/१२/२०२४ पासून ठेवीवरील व्याज दर खालीलप्रमाणे आहेत :-

अ.क्र.	ठेवींचे प्रकार	कालावधी	व्याज दर	
१.	बचत खाते		३.५०%	३.५०%
			सर्वसामान्य नागरिक	वरिष्ठ नागरिक
२.	मुदत ठेवी	७ दिवस ते ९० दिवस	४.२५%	४.२५%
		९१ दिवस ते १८० दिवस	४.७५%	४.७५%
		१८१ दिवस ते १ वर्षापर्यंत	५.५०%	५.५०%
		१ वर्षापेक्षा जास्त ते २ वर्षापर्यंत	७.००%	७.५०%
		२ वर्षापेक्षा जास्त ते ३ वर्षापर्यंत	७.७५%	८.२५%
		३ वर्षापेक्षा जास्त ते ५ वर्षापर्यंत	७.५०%	८.००%
		५ वर्षापेक्षा जास्त ते १० वर्षापर्यंत	७.००%	७.५०%
		१५ महिने (विशेष ठेव योजना)	७.७५%	८.२५%

- ज्येष्ठ नागरिकांना (६० वर्ष व त्यावरील) मुदत ठेवी एका वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता बँकेकडे ठेवल्यास अशा ठेवीवर व्याज दरापेक्षा ०.५०टक्के ज्यादा व्याज दर लागू आहे.

- रु १ कोटी व त्यावरील एकरकमी मुदत ठेवींसाठी (Bulk Deposit) १ वर्षे व त्यावरील कालावधीसाठी ०.२५% अतिरिक्त व्याज दर मिळेल.

ठेवी विमा हप्ता :

बँकेने डिपॉझिट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ॲक्ट १९६१ च्या तरतुदीनुसार सन २०२४-२०२५ या वर्षाची ठेव विमा हप्त्याची रक्कम विहित मुदतीत कॉर्पोरेशनकडे जमा केली आहे. Deposit Insurance and Credit Guarantee Corporation (DICGC) च्या नविन बदलाप्रमाणे बँकेतील प्रत्येक खातेदारास त्यांच्या ठेवींवर मिळणारे विमा कवच हे रुपये ५,००,०००/- करण्यात आलेले आहे.

४. भाग भांडवल :

मागील वर्षी रुपये १३९.३१ कोटी असलेले भाग भांडवल यावर्षी रुपये १५४.११ कोटी इतके झाले आहे. भाग भांडवलामध्ये रुपये १४.८० कोटीने वाढ झालेली आहे. भाग भांडवलामध्ये वाढ व्हावी या उद्देशाने दि.०१-०४-२०२४ पासून महत्तम भाग भांडवल मर्यादा रु.२५,००० /- वरुन रु ३५,०००/- करण्यात आली आहे.

५. राखीव व इतर निधी :

गतसाली रुपये ७२५.४९ कोटी असलेले बँकेचे राखीव निधी या वर्षात रुपये ७९१.८८ कोटी असून राखीव निधीमध्ये रुपये ६६.३९ कोटीने वाढ झालेली आहे. सदर वाढ ९.१५ टक्के आहे.

६. कर्जव्यवहार :

गतसाली रुपये ३०७१.७५ कोटी असलेली कर्जे यावर्षी रुपये ३१२३.२१ कोटीपर्यंत वृध्दींगत झाली आहेत. कर्जामध्ये एकूण रुपये ५१.४६ कोटींची वाढ झाली असून सदर वाढ १.६८ टक्के आहे.

सध्याचे विविध कर्जावरील व्याज दर खालील प्रमाणे आहेत :

कर्जाचे व्याज दर

अ.क्र.	कर्जाचा प्रकार	व्याज दर
१	तातडीचे कर्ज	१०.०० टक्के
२.	सक्तीच्या बचत ठेवीवरील कर्ज	९.७५ टक्के
३.	मध्यम मुदत कर्ज	११.५० टक्के
४.	विमा तारणावरील कर्ज/राष्ट्रीय बचत पत्रावरील कर्ज	१०.०० टक्के
५.	गृहनिर्माण कर्ज	८.५० टक्के
६.	उच्च शैक्षणिक कर्ज	७.५० टक्के
७.	वाहन कर्ज	७.७५ टक्के
८.	मॉर्गेज कर्ज	१०.५० टक्के
९.	विशेष मुदत कर्ज	११.५० टक्के
१०.	गृह कर्ज टॉप-अप	१०.०० टक्के

सभासदांना मंजूर केलेल्या कर्जाचा तपशील

(रुपये कोटीत)

अ. क्र.	कर्जांचे प्रकार	२०२३-२०२४		२०२४-२०२५	
		मंजूर झालेले अर्ज	कर्ज रक्कम रुपये	मंजूर झालेले अर्ज	कर्ज रक्कम रुपये
१.	मध्यम मुदतीचे कर्ज	११५८४	१३८२.७३	१०४४६	२०४४.१६
२.	तातडीचे कर्ज	११०५४	१३४.७७	१०७४६	१४०.२६
३.	गृहनिर्माण कर्ज	४०३	११०.२५	५५	१८.५२
४.	उच्च शैक्षणिक कर्ज	१६	२.१९	४५	७.१०
५.	वाहन कर्ज	४७	३.०५	८८	६.६४
	एकूण	**२३१०४**	**१६३२.९९**	**२१३८०**	**२२१६.६८**

(अ) मध्यम मुदत कर्ज :

दि.३१.०३.२०२४ रोजी मध्यम मुदत कर्ज रुपये २७३२.३८ कोटी होते, त्यामध्ये आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये रुपये २९.७५ कोटीने वाढ होऊन मध्यम मुदत कर्ज रुपये २७६२.१३ कोटी इतके झाले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये एकूण १०४४६ सभासदांना रुपये २०४४.१६ कोटी इतकी कर्ज रक्कम मंजूर करण्यात आली. मध्यम मुदत कर्जाची कमाल मर्यादा रुपये १६.०० लाख इतकी आहे.

रुपये २.०० लाखापेक्षा जास्त ते रुपये १६ लाखापर्यंत कर्ज घेणा-या सभासदांना परतफेडीचा कमाल कालावधी १६० महिने आहे. मध्यम मुदत कर्जाची गणना पगाराच्या १/४ प्रमाणे करण्यात येते.

वसुली दाखला मिळालेले व कर्जे निर्लेखित केलेले मात्र आता कर्तव्यावर नियमित झाले आहेत अशा सभासदांसाठी मध्यम मुदत कर्ज मंजूरीची रक्कम ठरविताना १/४ प्रमाणे गणना करण्याऐवजी १/३ प्रमाणे गणना करण्यात येते. ज्या डीसी १ सभासदाची महानगरपालिकेत १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवाकाळ पूर्ण झाला असेल अशा सभासदांना मध्यम मुदत कर्ज घेताना एक जामिनदार अथवा पगाराचे खाते असा एन.सी.पी.एफ. सभासदाप्रमाणे नियम लागू आहे.

दिनांक ०८.११.२०२४ पासून मूळ कर्जाचा करारनामा रु.५००/- चे फ्रँकींग करण्यात यावे. जामिनदाराचा करारनामा रु.५००/- चे फ्रँकींग करण्यात यावे असा बदल स्टँप ॲक्टनुसार करण्यात आला आहे.

ज्या सभासदांचा महानगरपालिका सेवेत २० वर्षे सेवाकाळ पूर्ण झाला आहे किंवा वयाची ५५ वर्षे पूर्ण झाली असल्यास सदर सभासदांकडून बँकेचे कर्ज निरंक होईपर्यंत महानगरपालिकेत स्वेच्छानिवृत्तीकरीता अर्ज करणार नाही व केल्यास घेतलेले कर्ज निरंक करेन, अन्यथा बँक करेल त्या कायदेशीर कारवाईस माझी संमती राहील असे हमीपत्र रु.५००/- च्या बाँडपेपरवर Notary Before me करुन घेणेबाबतच्या नियमात बदल करण्यात आला असून दिनांक ०१.१२.२०२४ पासून सदरचे हमीपत्र ठरलेल्या नमुन्यानुसार बाँडपेपर न घेता केवळ सभासदाच्या सहीनिशी करारनाम्यासोबत जोडण्यात येते.

बिगर बँकींग आर्थिक संस्था (NBFC), राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँकांची सिबील रिपोर्टमध्ये कर्ज खाती येणे रक्कम बाकी रु.१,०००/- पेक्षा कमी असल्यास सदर बाबतीत सभासदांकडून थकित रकमेची परतफेड त्वरीत करणार असल्याचे प्रतिज्ञापत्र घेऊन सभासदास कर्ज घेण्यास पात्र ठरविण्यात येते तसेच ऑनलाईन पध्दतीअंतर्गत ॲपच्या माध्यमातून घेतलेल्या कर्जाअंतर्गत सिबील रिपोर्टमध्ये कर्ज खाती येणे रक्कम बाकी रु.२,०००/- पेक्षा कमी (एक किंवा एकापेक्षा जास्त असलेल्या सदर कर्जाची एकत्रित रक्कम) असल्यास सदर बाबतीत सभासदांकडून थकित रकमेची परतफेड त्वरीत करणार असल्याचे प्रतिज्ञापत्र घेऊन सभासदास कर्ज घेण्यास पात्र ठरविण्यात यावे असा नियम दिनांक ०१.०१.२०२५ पासून लागू करण्यात आला आहे.

सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका तसेच बिगर बँकिंग आर्थिक संस्था यांच्या कर्जाशी संबंधीत दस्तऐवजांची सत्यता पडताळणी करण्यात येते, सदर माहिती संबंधीत कर्जदार यांनाच संस्थेकडून देण्यात येते त्यामुळे शाखेतील कर्मचारी/अधिकारी यांनी सभासदासोबत (सभासदाचे आधारकार्डसोबत घेऊन) सदर संस्थेच्या कार्यालयामध्ये जाऊन सत्यतेबाबतचा शेरा दस्तऐवजाच्या मागील बाजूस नोंदवावा. तसेच नोंदीमध्ये सदर संस्थेतील ज्या कर्मचारी/अधिकारी यांच्याकडून स्पष्टता घेण्यात आली आहे, त्यांचे पद आणि नाव नमूद करण्यात यावे. तसेच शे-याखाली तपासणी करणा-या कर्मचारी/अधिकारी यांची सही आणि शिक्का उमटविण्यात यावा. तसेच काही संस्थांचे संपर्क कार्यालय इतर शहरांमध्ये अथवा इतर राज्यांमध्ये असेल तर अशा प्रकरणात तपासणी करताना सभासदाच्या रजिस्टर्ड ई-मेल आय.डी. मधून सदर दस्तऐवज सत्यतेबाबत विचारणा करण्याकरीता ई-मेल पाठविण्याचे सुचीत करण्यात येते तसेच शाखेचा ई-मेल आय.डी. C.C. मध्ये ठेवण्याचे निर्देश सभासदास देण्यात येतात व सदरच्या ई-मेलमध्ये विचारलेल्या प्रश्नाबाबत प्रत्युत्तर प्राप्त न झाल्यास, पुन्हा नव्याने सिबिल रिपोर्ट काढण्यात येऊन कर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यात येते व त्यानुसार कर्ज नियमितता अथवा निरंक झाले आहे अथवा नाही यासंदर्भातील खातरजमा करण्यात येत आहे. सदरचा नियम दिनांक ०४.०७.२०२५ पासून लागू करण्यात आला आहे.

इतर सहकारी बँका/वित्तीय संस्थेतील गृह कर्जाचा संपूर्ण कर्ज हफ्ता वेतनातून वजावट करुन उर्वरित वेतनावर नियमाप्रमाणे गणना करुन परतफेडीच्या क्षमतेनुसार मध्यम मुदत कर्ज मंजूर करण्यात येते. त्याकरीता सभासदाचे (एन.सी.पी.एफ. किंवा डीसी-१) पगाराचे खाते बँकेत असणे आवश्यक आणि एक जामिनदार देणे आवश्यक, तसेच ज्या सभासदांनी संयुक्त नांवे गृह कर्ज/घर तारण कर्ज घेतले असून सदर कर्जाची परतफेड संयुक्त नावातील दुसऱ्या (सभासद/बिगर सभासद) व्यक्तीकडून नियमितपणे येत असल्यास अशा कर्जाचा हफ्ता वेतनातून वजावट न करता नियमाप्रमाणे गणना करुन मध्यम मुदत कर्ज मंजूर करण्यात येते.

बँकेच्या कार्यक्षेत्रातील महापालिका कर्मचा-यांच्या, शिक्षण विभागाची बँक/विविध पतसंस्था यांच्या सभासदांना विशेष बाब म्हणून नियमात शिथिलता देऊन तेथील कर्ज टेकओव्हर करण्यासाठी कर्ज मंजूर करणेबाबत :-

बँकेच्या कार्यक्षेत्रातील महापालिका कर्मचा-यांच्या, शिक्षण विभागाची बँक/माध्यमिक शिक्षण, फायर ब्रिगेड, के.ई.एम. पतसंस्था यांच्या सभासदांनी सदर संस्थेमध्ये कर्ज सुविधा घेतलेली आहे. तसेच सदर संस्थेचे सभासद आपल्या बँकेचे देखील सभासद आहेत/सभासद होऊ इच्छित आहेत, अशा सभासदांसाठी कर्ज टेकओव्हर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच सिबील रिपोर्टमध्ये सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका तसेच बिगर बँकींग आर्थिक संस्थेच्या नियमित कर्जाचा उल्लेख असेल अशी कर्जे निरंक करण्यासाठी कमाल मर्यादा रक्कम रु.१५ लाख इतकी आहे. सहकारी बँकांची कर्ज टेकओव्हर करणेकरीता, टेकओव्हर करीत असलेले कर्ज नियमित असल्याचे, त्याव्यतिरिक्त सभासदाचे कोणतेही कर्ज सदर सहकारी बँकेत नसल्याचे व जामिनकीबाबतची माहिती म्हणजेच जामिनकी दिल्याची माहिती घेण्यात यावी. सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका यांच्या सदर कर्जाची सद्यस्थिती म्हणजेच कर्ज नियमित/अनियमित SMA -०, १, २ वर्गीकरण इत्यादीची माहिती घेण्यात येते. तसेच कर्ज निरंक झाल्यानंतर १० दिवसांत कर्ज निरंक झाल्याचा दाखला घेण्यात येतो. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये टेकओव्हर कर्ज सुविधेअंतर्गत १८८ सभासदांना एकूण कर्ज रक्कम रु.२६६२.०७ लाख मंजूर करण्यात आली आहे. माहे जून २०२५ च्या पगारपत्रकातून बँकेची वसुली प्राप्त न झालेल्या सभासदांपैकी काही सभासदांच्या सक्तीच्या ठेवीमधून केवळ कर्ज हप्त्याची वसूली करण्यात आली आहे अशा सभासदांनी कर्ज हप्त्याच्या रकमेचा भरणा सक्तीच्या ठेव खाती जमा करावा, तसेच एम.डब्ल्यू.एफ.च्या रकमेचा भरणा करावा, अशा सभासदांना कर्ज मंजूर करताना सदर सभासदाच्या कर्ज हप्त्यांची वसुली सक्तीच्या ठेव खात्यामधून करण्यात आली आहे अथवा सभासदाने कर्ज हप्त्यांची रक्कम भरणा केली आहे याची खातरजमा करण्यात येते. सभासद कामावर नियमितपणे हजर असल्याचा व आस्थापना वसुली बाबतची माहिती तसेच पुढील महिन्यातील तद्संबंधीत वसुली निरंक असल्याचा कार्यालयीन ज्ञाप (Departmental Memo) घेण्यात येतो.

कर्जाचा विनियोग (End Use) :

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक ०१.०७.२०१४ च्या परिपत्रक क्र.RBI/2014-2015/21 UBD.BPD (PCB) A/c. क्र.५/१३.०५.०००/२०१४-२०१५ नुसार मंजूर कर्जाचा विनियोग तपासणे गरजेचे आहे. सर्व कर्जदार सभासदांना विनम्र आवाहन करण्यात येते की, मंजूर करण्यात आलेल्या कर्जाच्या विनियोगाबाबतची (End Use) कागदपत्रे संबंधीत शाखेमध्ये जमा करण्यात यावीत. भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत कर्ज विनियोगाबाबत केलेल्या सूचनेनुसार दिनांक २८.०५.२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेच्या मंजूरीने कर्जाच्या घोषणा

पत्रामध्ये बदल करण्यात आलेला आहे. बदल करण्यात आलेल्या कर्जाच्या घोषणा पत्राची प्रत (परिशिष्ट 'ब') घेण्यात येते. तसेच परिशिष्ट '१' नुसार सादर तक्त्यामध्ये विनियोगाचे कारण नमूद करण्यात येते.

मध्यम मुदत कर्जदारांकरीता सामूहिक जीवन विमा संरक्षण पॉलिसी :

दिनांक ३०.०८.२०२४ रोजी झालेल्या बँकेच्या ७२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या सभासदांचे कर्ज सुरक्षित करण्याकरीता रु.७.५० लाख इतक्या रकमेचे सामूहिक जीवन विमा संरक्षण घेण्यास मंजूरी देण्यात येऊन विमा हप्ता दर रु.७.१२ (प्रती हजारी) (अधिक लागू असलेले कर) या दराने विमा पॉलिसी घेण्यात आली. सदर विमा योजना दिनांक २०.०९.२०२४ पासून अंमलात आली आहे.याद्वारे एकूण ३२,७१७ सभासदांना विमा संरक्षण प्राप्त झाले असून, बँकेने संबंधीत कर्जदार सभासदांच्या सक्तीच्या ठेवी नावे टाकून रू.१९.८१ कोटी रक्कम विमा हप्त्यापोटी विमा कंपनीस दिलेली आहे. दिनांक २०.०९.२०२४ पासून २२.०८.२०२५ पर्यंत १४२ मध्यम मुदत कर्जदार सभासद मृत झाल्याची माहिती बँकेस प्राप्त झाली. यापैकी १३३ प्रकरणांमध्ये विम्याचे दावे कंपनीकडून मंजूर करण्यात आले आहेत व उर्वरीत ९ प्रकरणांमध्ये विमा कंपनीकडे दावे मंजूरीची प्रक्रिया सूरू आहे. सदर दाव्यांच्या रकमेतून बँकेस रू.७.२६ कोटी व सभासदांच्या वारसास रू.२.७१ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. सदर विमा पॉलिसी अंमलात आणल्याने रू.७.२६ कोटी इतकी रक्कम एन.पी.ए. प्रकरणांमध्ये जाण्यास प्रतिबंध झाला आहे. सर्व मध्यम मुदत कर्जदार सभासदांना याद्वारे विनम्र आवाहन करण्यात येते की, आपण वारसाची नोंद संबंधीत शाखेमध्ये त्वरीत करावी.

जामिनकी हमी निधी :

जामिनकी हमी निधीची गणना करताना तातडीचे कर्ज व सक्तीच्या ठेवीवरील कर्जाव्यतिरिक्त सभासदाच्या मंजूर केलेल्या कर्जामधून अगोदरचे शिल्लक कर्ज वजा करुन उर्वरित कर्ज रकमेवर दर हजारी रुपये ५/- प्रमाणे परत न मिळण्याच्या तत्वावर जामिनकी हमी निधी वसुल करण्यात येतो. सभासदास मंजूर केलेल्या मध्यम मुदतीच्या कर्जामधून अगोदरचे शिल्लक मध्यम मुदतीचे कर्ज तसेच मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये विम्यासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयानुसार विमा राशीचे रु.७.५० लाख वजा करुन उर्वरीत कर्ज (उणे नसलेल्या) रकमेवर दरहजारी रु.५/- प्रमाणे परत न मिळण्याच्या तत्वावर जामिनकी हमी निधी वसूल करण्यात येतो. मंजूर कर्ज हजाराच्या पटीत पूर्ण नसल्यास तरी वरीलप्रमाणे जामिनकी हमी निधी वसुल केला जातो.

(ब) उच्च शैक्षणिक कर्ज :

सभासदांच्या पाल्ल्यांच्या उच्च शिक्षणासाठी कमाल कर्ज मर्यादा रुपये ४०.०० लाख असून व्याज दर ७.५०% व परतफेडीचा कालावधी १२० महिने आहे. अहवाल वर्षात ४५ सभासदांनी त्याच्या पाल्ल्याकरीता रु.७.१० कोटी इतक्या रकमेच्या शैक्षणिक कर्जाचा लाभ घेतला आहे. पती-पत्नी दोघेही महानगरपालिकेत नोकरी करीत असल्यास त्यांना पाल्ल्यांच्या उच्च शिक्षणाकरीता एकत्रित कमाल कर्ज मर्यादा रु.८०.०० लाख राहील.

शैक्षणिक कर्ज रकमेमध्ये वसतिगृहाची फी किंवा शैक्षणिक कालावधीमध्ये पाल्ल्यांचा वसतीगृहाचा खर्च किंवा इतर ठिकाणी भाडे तत्वावर राहण्याचा खर्च, परिक्षा फी, लायब्ररी फी, लॅबोरेटरी फी, पुस्तके, इक्विपमेंट, इन्स्ट्रुमेंट, युनिफॉर्म फी, कॉलेजमधून परत मिळणारी डिपॉझिट रक्कम, कॉशन डिपॉझिट, बिल्डींग फंड, शैक्षणिक सहलीचा खर्च, प्रोजेक्टचा खर्च तसेच विमा हफ्त्याची रक्कम शैक्षणिक कर्ज म्हणून देण्याचा नियम करण्यात आला. तसेच moratorium कालावधी २ वर्षाऐवजी ४ वर्षे किंवा शैक्षणिक कालावधी यापैकी कमी असलेल्या कालावधीसाठी देण्याचा नियम करण्यात आलेला आहे.

(क) वाहन कर्ज :

वाहन कर्जाचा व्याज दर ७.७५% इतका करण्यात आलेला आहे. नविन चार चाकी व दुचाकी वाहन खरेदीसाठी वाहनांच्या एकूण किंमत (एक्स शोरुम किंमत + आर.टी.ओ. कर + विमा हफ्ता) किंमतीच्या ९० टक्केपर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. तसेच जुन्या चार चाकी वाहन खरेदीकरीता सरकार मान्यताप्राप्त मुल्यांकन किंमत + आर.टी.ओ. कर + विमा हफ्त्याच्या ९० टक्केपर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. अहवाल सालात ८८ सभासदांनी रु.६.६४ कोटी इतक्या रकमेचा वाहन कर्जाचा लाभ घेतला आहे. वाहन कर्जाकरीता डीसी-१ तसेच एन.सी.पी.एफ. सभासदांना पगाराचे खाते आपल्या बँकेत असणे किंवा एक जामिनदार देणे आवश्यक राहील. दिनांक १५.११.२०२४ पासून मंजूर होणा-या सर्व वाहन कर्ज प्रकरणात सभासदास कर्ज हप्ता तसेच इ.एम्.आय्. पध्दत लागू करण्यात आली आहे. कर्ज घेतेवेळी सभासदामार्फत निश्चित करण्यात आलेला पर्याय म्हणजेच कर्ज हप्ता पध्दत किंवा इ.एम्.आय्. पध्दतीनुसार कर्ज मंजूर झाल्यावर कर्ज निरंक होईपर्यंत बदल करता येणार नाही. सदर इ.एम्.आय्. पध्दत फक्त नव्याने दिनांक १५.११.२०२४ नंतर मंजूर होणा-या वाहन कर्जास लागू करण्यात आली आहे व त्याआधीच्या वाहन कर्जास इ.एम्.आय्. पध्दत उपलब्ध करण्यात आलेली नाही. दिनांक ०१.०३.२०२५ पासून पुढे मंजूर प्रकरणांमध्ये वाहनाच्या चावीचा सेट बँकेकडे घेण्यात येऊ नये असा नियम करण्यात आला आहे.

(ड) तातडीचे कर्ज :

तातडीच्या कर्जाची कमाल मर्यादा रुपये ४.०० लाख आहे व कर्जाचा व्याज दर १०.०० टक्के आहे. तातडीचे कर्ज सभासदाच्या सक्तीच्या ठेवीच्या शिल्लक रकमेइतके, रुपये १०००/- च्या पटीमध्ये मंजूर करण्यात येईल. मात्र रुपये १०००/- पेक्षा कमी कर्ज मंजूर केले जाणार नाही. तातडीचे कर्ज घेतल्यापासून सलग ५ महिने पगारापत्रकातून नियमित वसुली प्राप्त झाल्यास सभासदाला त्याच्या आवश्यकतेनुसार तातडीचे कर्ज मंजूर करण्याचा नियम करण्यात आला आहे. सभासदाच्या सक्तीच्या ठेव खात्यात, सभासदत्वाच्या कालावधीनुसार कमी रक्कम जमा असेल व सभासद सदर कमी असलेली रक्कम भरण्यास इच्छूक असल्यास सदर रक्कम सभासदाच्या बचत खात्यात भरुन घेऊन सभासदाच्या संमती पत्रानुसार सक्तीच्या ठेव खाती जमा करण्यात येईल.तातडीचे कर्ज करतेवेळी पुन्हा के.वाय्.सी. कागदपत्रांची मागणी करण्यात येत नाही. (के.वाय्.सी. कागदपत्रे : आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, वैध वाहन परवाना, वैध पारपत्र, एन्.आर.ई.जी.ए.कार्ड) तसेच बँकेच्या रेकॉर्डमध्ये पॅनकार्डची प्रत उपलब्ध असल्यास पुन्हा सभासदाकडून पॅनकार्डची मागणी करण्यात येत नाही.

(इ) गृह कर्ज :

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार एका सदनिकेकरीता (Per Dwelling Units) रु.६० लाख इतकी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. एका सभासदास एका सदनिकेकरीता महत्तम रू.६० लाख इतके गृहकर्ज मंजूर करण्यात येत आहे, तसेच सदरच्या नियमानुसार सभासदाच्या पगारपत्रकानुसार चांगली क्षमता असल्यास आपल्या बँकेतून गृहकर्जाच्या इतर नियमांसापेक्ष एकापेक्षा जास्त गृहकर्ज मंजूर करण्यात येते, गृहकर्जाकरीता ८.५०% इतका व्याज दर आहे.

सर्व सभासदांना विनम्र आवाहन करण्यात येते की, बँकेचा सध्याचा गृह कर्जाचा व्याज दर ८.५० द.सा.द.शे. इतका स्पर्धात्मक असून जास्तीत जास्त सभासदांनी गृह कर्जाचा लाभ घ्यावा. तसेच त्यांचे इतर बँकेतील शिल्लक गृह कर्ज आपल्या बँकेत वर्ग करुन सदरच्या व्याज दराचा लाभ घ्यावा.

सभासद ज्या इमारतीमध्ये सदनिका घेत असेल ती इमारत २० वर्षापेक्षा जुनी नसावी, यामध्ये बदल करुन सभासद ज्या इमारतीमध्ये सदनिका घेत असेल ती इमारत वापर परवाना/इमारत पूर्णत्वाच्या दाखल्याच्या तारखेपासून ३० वर्षापेक्षा जुनी असल्यास सदर इमारतीचे पुढील आयुष्यमान २० वर्षापेक्षा जास्त असल्याबाबतचा स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचा दाखला सादर केल्यास सदर इमारतीत सदनिका खरेदीकरीता इतर नियमासापेक्ष कर्ज मंजूर करण्यात येते.

महापालिका, नगरपालिका, नगर परिषद हद्दीत नगर रचना विभागाची मंजूरी प्राप्त असलेल्या इमारतीत सदनिका खरेदीकरीता गृह कर्जासाठी जामिनदार घेण्याची अट रद्द करण्यात आली आहे. तसेच परतफेड क्षमतेची गणना करताना ३० टक्केऐवजी २५ टक्केप्रमाणे गणना करण्यात येते.

तसेच ग्रामपंचायत हद्दीमध्ये गृह कर्ज घेत असल्यास अशा प्रकरणात दिनांक ०५.०५.२००८ पूर्वी महानगरपालिका सेवेत असलेल्या बँकेच्या सभासदांकरीता (एन.सी.पी.एफ.) आणि दिनांक ०५.०५.२००८ रोजी किंवा त्यानंतर महानगरपालिका (डीसी-१) (महापालिकेत ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा कालावधी पूर्ण झालेले सभासदांकरीता) जामिनदार घेण्याची अट रद्द करण्यात आली आहे. मात्र दिनांक ०५.०५.२००८ रोजी किंवा त्यानंतर महानगरपालिका सेवेत रुजू झालेल्या सभासदांकरीता (डीसी-१) (महापालिकेत ५ वर्षापेक्षा कमी सेवा कालावधी पूर्ण झालेल्या सभासदांकरीता) एक जामिनदार घेण्यात येईल.

महानगरपालिकेचे जे कर्मचारी बँकेचे सभासद आहेत, मात्र त्यांचा एन.सी.पी.एफ. किंवा डीसी-१ कापला जात नाही, अशा सभासदांना जामिनदार न घेता गृह कर्ज मंजूर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र ग्रामपंचायत मंजूरीच्या कर्ज प्रकरणात (कर्ज धोरणानुसार) एक जामिनदार ज्यांचा भविष्य निर्वाह निधी किंवा डीसी-१ कापला जात नसेल, तरी अशा सभासदांस जामिनदार म्हणून घेण्यात यावे.

ग्रामपंचायत मंजूरीच्या कर्ज प्रकरणात परतफेड क्षमता काढताना २५ टक्क्याप्रमाणे गणना करण्यात येईल अशा कर्जाची मर्यादा रुपये २५ लाख करण्यात आली आहे.

ॲफिडेव्हीट-कम-डिक्लरेशन, कर्ज फेडीबाबत कर्जदाराने दिलेले अधिकार पत्र, इक्विटेबल मॉर्गेज पुष्टीकरण, डिक्लरेशन अशी वेगवेगळी कागदपत्रे न घेता त्याऐवजी सदर चारही कागदपत्रांचा मसुदा एकत्रित असलेले ॲफिडेव्हीट-कम-डिक्लरेशन घेण्याबाबत बदल करण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे सभासदांना सदरची वेगवेगळी कागदपत्रे नोटरी करण्याऐवजी एकच कागदपत्र नोटरी करावा लागेल.

रेरा अंतर्गत मंजूर असलेल्या प्रकल्पांबाबत, बिल्डर, कर्जदार व बँक यामधील त्रिपक्षीय करार करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबतचा बदल करण्यात आला आहे. तसेच बिगर सभासद पती किंवा पत्नीसमवेत एकत्रित नांवे केलेला गृह खरेदीखत किंवा करारनामा असला तरी गृह कर्जासाठी सदर सभासदास पात्र ठरविण्यात येते.

संयुक्त गृह कर्ज करारनाम्यामध्ये बिगर सभासद पती/पत्नी व्यतिरिक्त वडील-मुलगा, वडील-अविवाहीत मुलगी, आई-मुलगा, आई-अविवाहीत मुलगी, भाऊ-भाऊ यांचे नांव संयुक्त करारनाम्यामध्ये द्वितीय असल्यास गृह कर्ज मंजूर करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

गृह कर्ज अर्ज करतेवेळी सभासदाचा महानगरपालिकेतील सेवा कालावधी सातत्याने एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असणेबाबतच्या नियमात बदल करुन सभासदाचा सेवा कालावधी सातत्याने एक महिना किंवा त्यापेक्षा अधिक असणेबाबतचा नियम करण्यात आला आहे. गृह कर्जाचा करारनामा संयुक्तरित्या केलेला असल्यास तसेच सभासदाची पती/पत्नी महानगरपालिके व्यतिरिक्त इतर ठिकाणी कार्यरत असल्यास अशा गृह कर्ज प्रकरणात कर्जाची गणना २५ टक्केऐवजी १० टक्केप्रमाणे करणेबाबत नियम करण्यात आला आहे.

इतर बँकेचे किंवा वित्त संस्था (एन.बी.एफ.सी.) चे अंडर कन्स्ट्रक्शन अंशत: अधिदान केलेले गृह कर्ज टेकओव्हर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र/आयुर्विमा पॉलिसी तारणावरील कर्ज सुविधा १० टक्के व्याज दराने उपलब्ध आहे.

इक्विटेबल मॉर्गेजच्या नोटीस ऑफ इंटिमेशनबाबत :-

दिनांक २३.०८.२०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमधील मंजूरीनुसार नोटीस ऑफ इंटिमेशनसंदर्भात बँकेच्या माहे एप्रिल २०२३ पासून सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये ज्या गृहकर्जाचे नोटीस ऑफ इंटिमेशन झाले नाही अशा सभासदांनी पुन्हा ०.३% दराने स्टँम्प डयुटी योग्य महसूली जिल्हयामध्ये भरुन इक्विटेबल मॉर्गेजच्या नोटीस ऑफ इंटिमेशन करणे व विहीत नमुन्यामध्ये रिफंडसाठी पूर्वी ज्या चूकीच्या जिल्हयात रक्कम भरली होती त्या विभागाच्या डी.डी.आर. कार्यालयाकडे सभासदामार्फत अर्ज करण्यात यावा यानुसार सभासदामार्फत स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. सदर संबंधीत सभासदांनी इक्वीटेबल मॉर्गेज व नोटीस ऑफ इंटिमेशन पूर्ण करावे.

मुंबई महानगरपालिका पुरस्कृत माहुल येथील सदनिकांबाबत :

दिनांक ०३.०६.२०२५ रोजी निर्गमित कार्यालयीन आदेशानुसार मुंबई महानगरपालिका पुरस्कृत माहुल येथील सदनिका घेणा-या बँक सभासदांना गृहकर्ज सुविधा देण्याबाबत नियम लागू करण्यात आला आहे व त्यानुसार प्रति सदनिका किंमत रु.१२.६० लाख व जोडी सदनिकेकरीता किंमत रु.२५.२० लाख (अधिक मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क) करीता गृहकर्ज देण्यात येईल. बँकेकडून गृहकर्ज घेण्यासाठी येणा-या विजेत्या सभासदांनी अनामत रक्कम भरणा केल्याची पावती व तात्पुरते देकारपत्र (Provisional offer Letter) शाखा कार्यालयांमध्ये सादर करणे आवश्यक राहील. अनामत रक्कम भरणा केल्याची पावती व तात्पुरते देकारपत्र महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर सभासदाचे पगारपत्रक व के.वाय.सी. पुर्तता नसल्यास तदसंबंधीत कागदपत्रे घेऊन सदनिकेच्या किंमतीच्या ९५% मर्यादेपर्यंत कर्ज मंजूरीसाठी अर्ज स्किारण्यात येऊन कर्जव्यवहार समितीस मंजूरीकरीता अर्ज सादर करण्यात येईल, सदर पगारपत्रकानुसार बँकेच्या गृहकर्ज नियमावलीनुसार कर्ज देता येईल, याची खातरजमा शाखेने करावी. एका सदनिकेकरीता रु.१२.६० लाख या मूळ किंमतीच्या ९५% रक्कम रु.११.९७ लाख इतके कर्ज मंजूर करण्यात येईल. सदनिकेच्या मुळ किंमतीच्या २५% रकमेचा भरणा महानगरपालिकेच्या खात्यामध्ये थेट शाखेमार्फत करण्यात येईल.

सदर सदनिकांचे विकासक मुंबई महानगरपालिका स्वत: असल्याने सदर सदनिकांची सर्व प्रक्रिया महापालिका राबविणार असल्याने बँकेमार्फत गृहकर्ज सुविधा देताना नियमावलीमध्ये शिथिलता देण्यात येऊन ''वास्तुविशारद (Architect) यांच्याकडून जागेचे मुल्यमापन अहवाल व कायदेशीर (Legal) बाबींचा अहवाल" घेण्यात येणार नाही. तसेच सदनिकेच्या मुळ किंमतीच्या ९५% पर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल. गृहकर्जाचे इतर नियमांसापेक्ष कर्ज प्रक्रियेचा अवलंब करण्यात येईल.

(ई) मॉर्गेज कर्ज :

मॉर्गेज कर्जाची मर्यादा रुपये ५० लाख किंवा मॉर्गेज मालमत्तेच्या ७५ टक्केपर्यंत (पैकी कमी असलेली रक्कम) व व्याज दर १०.५० टक्के आहे. तरी सभासदांनी सदर कर्ज सुविधेचा लाभ घ्यावा.

(उ) विशेष मुदत कर्ज :

बँकेने सभासदांकरीता विशेष मुदत कर्ज रुपये २५ लाखापर्यंत इतर कर्ज नियमासापेक्ष उपलब्ध करुन दिले आहे. सभासद किमान रुपये १६ लाख व कमाल रुपये २५ लाखापर्यंत कर्जाचा लाभ घेऊ शकतात. सदर कर्जाचा व्याज दर ११.५० टक्के इतका आहे. कर्जाची परतफेड कमाल १५ वर्षे (१८० हप्त्यात) करता येईल. सदर कर्जाची वसुली सभासदाच्या सेवाकाळामधून (वयाच्या ५८ वर्षापर्यंत, वैद्यकीय सेवेत असलेले डॉक्टर यांच्या वयाच्या ६४ वर्षापर्यंत) नियमानुसार तीन महिने वजा करून होऊ शकेल अशाच सभासदांना कर्ज दिले जाईल व जास्तीत जास्त १५ वर्षाच्या कालावधीत संपूर्ण कर्जाची सभासदाने व्याजासहीत परतफेड करावी लागेल. सहकारी बँका, पतसंस्था वगळता इतर

राष्टीयकृत किंवा खाजगी किंवा बिगर बँकींग संस्थेत कर्जदार असलेल्या सभासदास नियमानुसार सदर संस्थेचा हप्ता वजा करुन कर्जाची गणना करण्यात येईल व ४०% ऐवजी २५%गणनेनुसार (हंगामी हप्ते वगळून) कर्ज देण्यात येईल, सदरचा बदल दिनांक ०१.१२.२०२४ पासून करण्यात आला आहे. तरी सभासदांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा.

सदरचे कर्ज घेण्याकरीता कमीत कमी एक वर्षे महापालिकेत अखंडित सेवा तसेच बँकेचे सभासदत्व असणे आवश्यक आहे. पगाराचे खाते बँकेत असणे आवश्यक,पगाराचे खाते बँकेत नसल्यास ई.सी.एस. फॉर्मची प्रत संबंधीत खातेप्रमुखाकडे देऊन त्याची पोच अर्जासोबत जोडल्यानंतर कर्जासाठी पात्र ठरवले जाईल. सदरच्या कर्जास एक किंवा दोन सक्षम जामीनदार आवश्यक, सदर जामीनदारांचे एकत्रित रक्कम वेतनाच्या २५ टक्के वजावट करून दोन्ही किंवा एका जामीनदाराच्या उर्वरीत नक्त वेतन कर्जदाराच्या हप्त्याएवढे किंवा त्यापेक्षा जास्त असावे. तसेच सदर जामीनदाराने खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेत कमीत कमी एक वर्ष अखंडीत सेवा तसेच बँकेचे सभासदत्व असणे आवश्यक आहे. सदर जामीनदार थकबाकीदार नसावेत.

(ऊ) राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र/आयुर्विमा पॉलिसी तारणावरील कर्ज :

राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र/आयुर्विमा पॉलिसी तारणावरील कर्ज सुविधा १०% व्याज दराने उपलब्ध आहे.

(ए) गृह कर्ज टॉप-अप :

गृह कर्ज टॉप अप कर्जाची मर्यादा रुपये २५ लाख किंवा सभासदाच्या परतफेड क्षमतेनुसार येणा-या रकमेच्या किंवा वास्तूच्या अलिकडील मुल्यांकन रकमेच्या ९० टक्केपर्यंत तसेच व्याज दर १० टक्के आहे. तरी सभासदांनी सदर कर्ज सुविधेचा लाभ घ्यावा.

(ऐ) अनुत्पादीत कर्जे (एन.पी.ए.):

आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये बँकेची एकूण अनुत्पादीत कर्जे रु.१३०.०९ कोटी होती व ढोबळ एन्.पी.ए.चे प्रमाण ४.२३% होते व नक्त एन्.पी.ए. निरंक होता. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये बँकेची अनुत्पादीत कर्जे रु.१४१.७९ कोटी झाले आहे व ढोबळ एन्.पी.ए. चे प्रमाण ४.५४% असून नक्त एन्.पी.ए. निरंक आहे. अहवाल वर्षात एन्.पी.ए. बाबत बँकेने बुडीत व अनिश्चित कर्जे निधीत रुपये १०.७७ कोटी इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बँकेकडे रु. ११२.६३ कोटी इतकी रक्कम जामिनकी हमी निधीमध्ये उपलब्ध आहे.

मागील आर्थिक वर्षाच्या थकित कर्जाची या आर्थिक वर्षाच्या थकीत कर्जाशी तुलना करता एन्.पी.ए.रकमेत रुपये ११.७० कोटीने वाढ झाल्याचे दिसत आहे. पूर्वी आपल्या बँकेत टप्पा पध्दतीने सभासदत्वाच्या कालावधीनुसार कर्ज मंजूर करण्यात येत होते. त्यामध्ये बदल करुन आता परतफेडीच्या क्षमतेनुसार कर्ज मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे बँकेच्या कर्ज मंजूर रकमेत वाढ झाली व त्याचा परिणाम एन.पी.ए. रकमेमध्ये वाढ होण्यामध्ये झाला आहे. बँकेची कर्ज खाती एन.पी.ए. होण्याची कारणे, सभासद कामावर अनियमित, मृत, काम करण्यास असमर्थ, सेवेतून बडतर्फ इत्यादी आहेत. त्यापैकी कामावर अनियमित हे एन.पी.ए. वाढीचे प्रमुख कारण आहे. दिनांक ०१.०५.२०१५ ते दिनांक ३०.०९.२०१६ या कालावधीत डीसी-१ सभासदांना कर्जासाठी जामिनदार घेण्याची पध्दत बंद करण्यात आली. या कालावधीत डीसी-१ सभासदांना दिलेल्या कर्जापैकी बरीच कर्ज खाती एन.पी.ए. झाली. त्यामुळे देखील एन.पी.ए. मध्ये वाढ झाली आहे.

एन.पी.ए. कर्ज खात्यांच्या वसुलीकरीता शाखा स्तरावर संबंधीत खात्यात पाठपुरावा करण्यात येतो. तसेच सभासदांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन वसुलीसाठी प्रयत्न केला जातो. त्याचप्रमाणे एन.पी.ए. कर्ज खात्यांच्या वसुलीकरीता महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मधील कलम १०१ अंतर्गत वसुलीची कारवाई करण्यात येते. ज्या प्रकरणांमध्ये वसुली दाखला प्राप्त झाला आहे अशा प्रकरणांत महापालिकेकडे पगारातून तसेच इतर देय रकमेतून वसुली मिळण्याकरीता 'विशेष वसुली अधिकारी' मार्फत आदेश देण्यात येतात. तसेच ज्या प्रकरणात थकीत कर्जदाराकडे जप्त करण्यायोग्य स्थावर/जंगम मालमत्ता आहे अशा प्रकरणात जप्तीची कारवाई करण्यात येते. सर्व प्रकारचे वसुलीचे प्रयत्न केल्यानंतर वसुल न होणारी कर्जे वैधानिक लेखा परिक्षकांनी खातरजमा केल्यानंतर निर्लेखित करण्यात येतात. यावर्षाचे लेखा तपासनीस मेसर्स लाहोटी कासट अँण्ड कंपनी यांनी ४७ कर्ज खाती व कर्ज रक्कम रुपये १.५९ कोटी निर्लेखित करण्याचे प्रमाणित केले आहे. सदर कर्ज खाती निर्लेखित करण्यास वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूरी देण्याची विनंती करण्यात येत आहे.

७. गुंतवणूक :

गतवर्षी गुंतवणुकीवरील व्याज रु.१२७.४१ कोटी होते व दिनांक ३१.०३.२०२५ रोजी सदर व्याज रु. १४४.०६ कोटी प्राप्त झालेले आहे. सदर व्याज गतवर्षाशी तुलना करता रुपये १६.६५ कोटीने वाढ झालेली आहे. सदर वाढ १३.०७ टक्के आहे. गुंतवणूकीवरील सरासरी व्याज परतावा गतवर्षी ६.५७ टक्के होता तो यावर्षी ६.७० टक्के झाला आहे. त्यामध्ये चालू वर्षी ०.१३ टक्के वाढ झाली आहे.

सदर गुंतवणूक सरासरी व्याज परताव्यामध्ये अंशत: वाढ दिसत असून भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी पतधोरण जाहीर करताना दिनांक ११.०४.२०२० रोजी वैधानिक रोख तरलता १८.२५ टक्के वरून १८ टक्के केली, तसेच संपूर्ण आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अर्धा टक्का रोख तरलतेमध्ये वाढ केल्यामुळे बँकीग उद्योगामध्ये रोख तरलतेचे प्रमाण (लिक्वीडीटी) कमी झाले. बँकांकडील रोख तरलता (लिक्विडीटी) कमी झाल्याने सरकारी कर्ज रोख्यावरील तसेच टी- बिल व्याज दरात वाढ झाल्याकारणाने गुंतवणुकीवरील सरासरी व्याज दरामध्ये वाढ झाल्याची दिसते. बँकेकडे असलेले अतिरिक्त निधी म्युच्युअल फंड (लिक्विड फंड) टर्म मनी डिपॉझिट यासारख्या चांगले उत्पन्न देणा-या पर्यायांमध्ये बँकेचे गुंतवणूक सल्लागार मेसर्स नाईट फिनटेक रिसर्च प्रायव्हेट लि. यांच्या सल्ल्यानुसार गुंतविण्यात आली आहे.

अहवाल साल अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रुपये २१५०.३१ कोटी आहे. गतवर्षी बँकेची एकूण गुंतवणूक रुपये २०१९ कोटी होती.

८. खेळते भांडवल :

गतवर्षी रुपये ५८०५.०५ कोटी असलेल्या खेळत्या भांडवलामध्ये घट होऊन यावर्षी खेळते भांडवल रुपये ५७१९.९३ कोटी झाले आहे. खेळते भांडवलामध्ये गेल्या वर्षाच्या तुलनेत रुपये ८५.१२ कोटीने घट झाली आहे. सदर घट १.४७ टक्के आहे.

९. नफा विभागणी :

अहवाल सालामध्ये बँकेस एकूण रुपये ११२.२८ कोटी नफा रुपये २.६४ कोटी डिफर्ड टॅक्स मिळकत समाविष्ट करुन झाला आहे. सहकारी बँकांना आयकर लागू केल्याने बँकेला सदर नफ्यातून रुपये ३३.५९ कोटी आयकर अधिदान/तरतूद करावी लागल्याने, विभागणीसाठी रुपये ७६.०५ कोटी नफा उपलब्ध आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ६६ नुसार प्रत्येक संस्थेने निव्वळ नफ्याच्या १/४ रक्कम राखीव निधीमध्ये वर्ग करावी लागते. तसेच कलम ६७ अन्वये लाभांशाचे जास्तीत जास्त दर १५ टक्के आहे व त्याप्रमाणे बँक लाभांश देत आहे. यावर्षी बँकेच्या नफ्यामध्ये चांगली वाढ झाल्याने सभासदांना अतिरिक्त ४ टक्के दराने लाभांश देण्याचे संचालक मंडळाचा मानस आहे. त्याप्रमाणे संचालक मंडळाने त्यांस मान्यता दिली असून सहकार खात्याच्या मंजूरीची आवश्यकता आहे तसेच सदर बाब भारतीय रिझर्व्ह बँकेस देखील कळविणे आवश्यक आहे व त्याचा पाठपुरावा सुध्दा सुरू आहे. जर वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी मंजूरी मिळाली तर सभासदांना अतिरिक्त ४ टक्के दराने लाभांशाचे अधिदान करण्यात येईल.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम क्रमांक ५२ नुसार संस्थेच्या निव्वळ नफ्यातून समतोल नफा विभागणी निधी उभारावा लागतो व सदर निधीमध्ये भरणा केलेल्या भाग भांडवलाच्या २ टक्केपेक्षा अधिक नाही इतकी रक्कम तसेच अशा निधीमधील एकूण रक्कम भरणा केलेल्या भाग भांडवलाच्या ९ टक्के इतकी होईपर्यंत, अशा निधीत जमा करावी लागते. मात्र अहवाल वर्षात ९ टक्केप्रमाणे पर्याप्त तरतूद बँकेकडे उपलब्ध आहे. त्यामुळे अहवाल सालात समतोल नफा विभागणी निधीमध्ये रक्कम वर्ग करण्यात आली नाही. बँकेच्या नवीन उपविधी क्रमांक ५४ नुसार सामाजिक बांधिलकी निधी उभारणे आवश्यक असून सदर निधी हा देणग्या किंवा सामाजिक कार्यासाठी (उदा. मुख्यमंत्री निधीस मदत इ.) वापर करता येतो. बँकेचा उपविधी क्रमांक ५५ नुसार शिक्षण निधीमध्ये नफ्याच्या कमीत कमी ५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० टक्केपर्यंत रक्कम वर्ग करुन संचालक, सभासद व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी त्या निधीचा वापर करता येईल. या तरतूदी विचारात घेऊन नफ्याच्या विभागणी पुढीलप्रमाणे करण्यास मान्यता देण्यासाठी संचालक मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे :-

तपशिल	दिनांक ३१.०३.२०२५ रोजी असलेली शिल्लक (रु.)	सन २०२३-२४ मध्ये करण्यात आलेली नफा विभागणी (रु.)	सन २०२४-२५ करीता शिफारस (रु.)
संचित निधी २५%	२,५०,६५,६१,४६७.३२	१८,५८,४४,४०५.८९	१९,०१,१९,८७७.९८
समतोल नफा विभागणी	-	-	-
*सामान्य उद्दिष्टांकरीता राखीव निधी	१५,६६,२६,०७६.००	-	-
भाग भांडवलावरील लाभांश १५%	-	१५ टक्के - २१,००,००,०००.०० ३ टक्के - ४,२०,००,०००.००	१५ टक्के- २२,००,००,०००.०० ४ टक्के - ५,९०,००,०००.००
सभासद कल्याण निधी	६३,५७,९५,१६७.२९	५,००,००,०००.००	१६,४६,५९,६३३.९३
सभासद स्वास्थ्य निधी	१६,०८,५९,४८५.५६	२,५०,००,०००.००	२५,००,०००.००
आकस्मिक गोष्टींसाठी निधी	२,३२,५०,०१५.४०	२५,००,०००.००	२५,००,०००.००
शिक्षण निधी	२९,०९,७९,६५१.३५	३,७२,००,०००.००	३,८०,००,०००.००

तपशिल	दिनांक ३१.०३.२०२५ रोजी असलेली शिल्लक (रु.)	सन २०२३-२४ मध्ये करण्यात आलेली नफा विभागणी (रु.)	सन २०२४-२५ करीता शिफारस (रु.)
कर्मचारी कल्याण निधी	३,५८,३९,१३८.४४	१,००,००,०००.००	-
अस्थिर गुंतवणूक निधी	२७,८५,०२,३६५.०५	२,५०,००,०००.००	-
संगणक निधी	२४,६५,०६,५३६.६३	२,५०,००,०००.००	-
विकास निधी	९०,८३३.००	-	-
दुरुस्ती व नुतनीकरण निधी	१०,११,४२,०९३.१९	१,२५,००,०००.००	२,५०,००,०००.००
सेफ डिपॉझिट व्हॉल्ट निधी	२०,९०,८३३.००	-	-
सामाजिक बांधिलकी निधी	१,१४,८१,९४६.४४	१५,००,०००.००	५,००,०००.००
निवृत्त सभासद कल्याण निधी	२,२२,४५,१५४.३४	२५,००,०००.००	२५,००,०००.००
इमारत निधी	५५,२१,११,६६७.००	५,००,००,०००.००	-
जामिनकी हमी निधी	१,१२,६३,४४,०४४.५९	-	-
गुंतवणूक घसारा निधी	९,७२,९७,८०१.००	-	-
संकट निवारण निधी	६,०८,९१,५७०.००	-	-
मुख्य कार्यालय इमारत लीज नुतनीकरण निधी	६,४३,००,०००.००	६,४३,००,०००.००	५,५७,००,०००.००
शिल्लक नफा		३३,२१७.६७	-
एकूण	६३७,२९,१५,८४५.६०	७४,३३,७७,६२३.५६	७६,०४,७९,५११.९१

* भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक ३०/०७/२०२४ रोजीच्या परिपत्रक क्र. RBI/2024-25/57/ DOR. CAP. REC. No. 30/09.18.201/ 2024-25 नुसार समतोल नफा विभागणी निधीअंतर्गत जमा असणारी एकूण रु. १५,६६,२६,०७६.०० इतकी रक्कम सामान्य उद्दिष्टांकरीता राखीव निधी या निधीमध्ये जमा करण्यात आली आहे.

१०. सक्तीची बचत ठेव :

अहवाल सालामध्ये सक्तीच्या बचत ठेवी रुपये १०१३.६२ कोटी झाल्या असून गेल्या वर्षाच्या तुलनेत सदर ठेवीमध्ये रुपये ९८.०८ कोटीने घट झाल्याचे दिसून येते. सदर घट ८.८२ टक्के आहे. यावर्षी सभासदांना ८.५० टक्के दराने व बिगर सभासदांना ७.८० टक्के दराने व्याज देण्यात आले होते. सदर व्याज दिनांक ३१.०३.२०२५ रोजी सभासदांच्या बँकेतील बचत खात्यात जमा करण्यात आले असल्यामुळे सदर घट दिसत आहे. पगारपत्रकाद्वारे सक्तीच्या बचत ठेवीची किमान मर्यादा रुपये १,०००/- असून सदर ठेवीसाठी कोणतीही कमाल मर्यादा नसल्यामुळे सभासदास रुपये १,०००/- पेक्षा जास्त रक्कम दरमहा पगारपत्रकाद्वारे जमा करता येईल.

११. लाभांश :

सहकार खात्याने जास्तीत जास्त १५ टक्के दराने लाभांश देण्याची मर्यादा निश्चित केली असल्याने बँक सदर मर्यादेनुसार अद्यापपर्यंत लाभांश देत आली आहे.

मा. विभागीय सह-निबंधक यांच्या परवानगीनुसार साल २०२१-२०२२ मध्ये १५ टक्के लाभांश रकमेत ३ टक्केने वाढ करून १८ टक्केप्रमाणे तसेच साल २०२२-२०२३ मध्ये मा. विभागीय सह-निबंधक यांच्या परवानगीनुसार १५ टक्के लाभांश रकमेत ५ टक्केने वाढ करून २० टक्केप्रमाणे तसेच साल २०२३-२०२४ मध्ये १५ टक्के लाभांश रकमेत ३ टक्केने वाढ करून १८ टक्केप्रमाणे सभासदांना लाभांश अदा करण्यात आला.

१२. हिशेब तपासणी :-

- **कंकरंट हिशेब तपासणी (Concurrent Audit)**

  सन २०२४ – २०२५ या आर्थिक वर्षाकरीता मे. एन. वाय. सी. ए. ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट यांना मुख्य कार्यालय व १० शाखा आणि मे. अखिलेश पांडे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट यांना ११ शाखा करिता कंकरंट हिशेब तपासनीस म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. मे. अखिलेश पांडे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट यांनी ०१.०४.२०२४ ते ३१.०१.२०२५ या कालावधीकरीता कंकरंट लेखा तपासणीचे काम पूर्ण केलेले आहे. यानंतर मे. अखिलेश पांडे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट यांनी ११ शाखांचे कंकरंट लेखापरिक्षण तपासणी करण्यास असमर्थता दर्शविल्याने दिनांक ०१.०२.२०२५ ते ३१.०३.२०२५ या कालावधीचे उर्वरीत ६ शाखांचे काम मे. एन.वाय.सी.ए. ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट व इतर उर्वरित ५ शाखांचे काम बँकेच्या अंतर्गत लेखा परिक्षण विभागाने पुर्ण केलेले आहे.

- **अंतर्गत लेखा परिक्षण(Internal Audit)**

  भारतीय रिझर्व्ह बँकेने अंतर्गत लेखा परिक्षण विभाग स्थापित करावयास सांगितले आहे, त्याची पुर्तता म्हणून स्टाफींग पॅटर्नमध्ये सदर विभागामार्फत आवश्यक कर्मचारी / अधिकारी यांची तरतूद करण्यात आलेली होती, माहे सप्टेंबर २०२३ मध्ये बँकेचा अंतर्गत लेखा परिक्षण विभाग कार्यान्वित झालेला आहे. बँकेच्या अंतर्गत लेखा परिक्षण विभागा मार्फत दिनांक ०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५ या कालावधीकरीता मुख्य कार्यालय व १७ शाखांचे लेखा परिक्षण पुर्ण करण्यात आलेले आहे.

- **लेखा परिक्षण समिती(ACB Committee)**

  भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अधिकाऱ्यांनी संगणक, सल्लागार, विधी व लेखा परिक्षण समितीचे विभाजन करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार उपसमित्यांचे विभाजन करुन स्वतंत्र लेखापरिक्षण समितीची गठित करण्यात आली. सर्व शाखांचा लेखापरिक्षण अहवालाचा आढावा घेऊन पुर्तता करणे, लेखा परिक्षकांची नेमणूक करणे व लेखापरिक्षण फी ठरवणे, इत्यादी. जबाबदाऱ्या समितीवर सोपविण्यात आल्या आहेत अहवाल सन २०२४–२०२५ मध्ये या समितीच्या एकुण १३ सभा झालेल्या आहेत.

- **जोखीम आधारीत अंतर्गत लेखा परिक्षण (Risk Based Internal Audit):-** भारतीय रिजर्व बँकेच्या निर्देशानुसार, रु ५०० कोटी पेक्षा कमी मालमत्ता असणाऱ्या बँक सर्व पगारदार सहकारी बँक, युनिट बँका व भारतीय रिजर्व बँकेच्या सर्व समावेशक निर्देशांतर्गत सहकारी बँक वगळता, इतर अन्य बँकांना Risk Based Internal Audit धोरण लागू करण्यात आलेला आहे. आपली बँक पगारदार सहकारी बँक असल्यामुळे, आपल्या बँकेला सदरचे जोखीम आधारित अंतर्गत लेखा परिक्षण लागू नाही, मात्र आपल्या बँकेचे अंतर्गत लेखा परिक्षण व्यवस्था मजबूत व्हावी याकरीता बँकेने जोखीम आधारित लेखा परिक्षण कार्यप्रणाली सुरू केलेली आहे. यामध्ये बँकेने जोखीम अंतर्गत व्यवस्थापनात रिस्क बेस ऑपरेशनल रिस्क, लिक्विडिटी रिस्क व क्रेडिट रिस्क, यांचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

- **सिस्टीम ऑडीट :**

  मे. असोसिएटस आय.टी कन्सलटंट प्रा.लि. यांनी दिनांक १९ मे २०२५ ते २९ मे २०२५ या कालावधीत सिस्टीम ऑडिट पूर्ण केलेले असून बँकेस सिस्टिम ऑडिट अहवाल दिनांक २७.०६.२०२५ रोजी व VAPT ऑडिट अहवाल दिनांक २३.०६.२०२५ रोजी प्राप्त झालेला आहे.

- **वैधानिक हिशेब तपासणी :**

  सन २०२४–२०२५ या वर्षाकरीता बँकेने नियुक्ती केलेले मे. लाहोटी कासट अँण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट या वैधानिक लेखा परिक्षकांनी आपल्या बँकेचे वैधानिक लेखा तपासणीचे काम पूर्ण केले असून त्यांनी बँकेस 'अ' वर्ग प्रदान केलेला आहे

- **भारतीय रिझर्व्ह बँकेची तपासणी :**

  भारतीय रिझर्व्ह बँकेचे महाव्यवस्थापक पाओबोई गांगटे व त्यांचे अधिकारी यांना आपल्या बँकेचे दिनांक ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीची तपासणी केलेली आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे व सदर प्राप्त अहवालाचा अनुपालन अहवाल देखील बँकेने रिझर्व्ह बँकेस सादर केलेला आहे.

- **मुख्य अनुपालन अधिकारी(Chief Compliance Officer (CCO)):** बँक टियर-१ मध्ये असल्याने मुख्य अनुपालन अधिकारी पदाची जबाबदारी अंतर्गत अधिकाऱ्यास देण्यात आली आहे.

- **मुख्य जोखीम अधिकारी (Chief Risk Officer (CRO)):**

  भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि. २५.०६. २०२१ रोजीच्या परिपत्रकाव्दारे ज्या नागरी सहकारी बँकेची मालमत्ता रु.५००० कोटींपेक्षा जास्त आहे. अशा बँकांना मुख्य जोखीम अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश दिलेले होते, त्यानुसार मुख्य जोखीम अधिकारी पदाची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांनी आपल्या कामाची सुरुवात केली आहे. त्यामुळे जोखीम व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे राबविले जात आहे, व नियामक मार्गदर्शक तत्वांचे पालन सुनिश्चित करण्यात येत आहे.

- **मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी (Chief Information Security Officer (CISO)) :**

  भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार, मुख्य माहिती सुरक्षा अधिकाऱ्याची दिनांक ०८/०१/२०२५ पासून नियुक्ती करण्यात आली आहे.

१३. शिष्यवृत्त्या :

विविध मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून पहिल्या तीन क्रमांकाने गुणवत्ता यादीत येणारे, व्यावसायिक परिक्षा उदा. एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस., बी.डी.एस., बी.एच.एम.एस., बी.व्ही.एस.सी., सी.ए., सी.एस., आय.सी.डब्ल्यू.ए., बी.पी. टी. एच उत्तीर्ण होणाऱ्या सभासदांच्या पाल्ल्यांचा तसेच व्यावसायिक परिक्षा उदा. एल.एल.बी., बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बॅचलर ऑफ फाईन आर्टस्, बी.ई. (पदवी), बी.टेक यामधून ७० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या सभासदांच्या पाल्ल्यांचा, त्याचप्रमाणे स्पर्धात्मक परिक्षा उदा. आय.ए.एस., आय.पी.एस., आय.आर.एस. मधून उत्तीर्ण होणाऱ्या सभासदांच्या पाल्ल्यांचा, तसेच इयत्ता १० वीच्या परिक्षेत ९० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण, इयत्ता १२ वी च्या परिक्षेत ८५ टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या सभासदांच्या पाल्ल्यांचा, तसेच सभासदांच्या अपंग पाल्ल्यांसाठी इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परिक्षेत ८० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्यांचा (अपंगत्वाच्या नॉर्म्सप्रमाणे ४० टक्के व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्यांचा) व इयत्ता ५ वी व ८ वी च्या परिक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा, होमी भाभा सायन्स सेंटर घेत असलेल्या परिक्षेमध्ये सुवर्ण, रजत पदक प्राप्त केलेल्या सभासदांच्या पाल्ल्यांचा तसेच एल.जी.एस., एल.एस.जी.डी. परिक्षेत संपूर्ण भारतामधून प्रथम दहा क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या सभासदांचा, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एम्.पी.एस्.सी.) च्या क्लास-१ अधिकाऱ्यांची परिक्षा उत्तीर्ण व केंद्रीय लोकसेवा आयोग (यु.पी.एस्.सी.) परिक्षेत उत्तीर्ण सभासद व सभासदांच्या पाल्ल्यांचा गुणगौरव करण्यात येतो. तसेच राज्यस्तरीय, अखिल भारतीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध खेळांच्या स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक स्पर्धेमध्ये प्रथम तीन क्रमांक वा सुवर्ण, रौप्य वा कांस्य पदक प्राप्त करणाऱ्या सभासदांचा व सभासदांच्या पाल्ल्यांचा बक्षीस रक्कम व प्रशस्तिपत्रक देऊन सत्कार करण्यात येतो. मागील काही शैक्षणिक वर्षांपासून गुणांचे नियम शिथिल करताना इयत्ता १० वीच्या परिक्षेत ८५ टक्के व अधिक गुण ते ९० टक्क्यापेक्षा कमी तसेच इयत्ता १२ वी च्या परिक्षेत ८० टक्केपेक्षा अधिक गुण ते ८५ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या पाल्ल्यांचा देखील सत्कार करण्यात आला होता. इयत्ता ५ वी व ८ वी च्या परिक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त केलेल्या, होमी भाभा सायन्स सेंटर घेत असलेल्या परिक्षेमध्ये सुवर्ण, रजत पदक प्राप्त केलेल्या सभासदांच्या पाल्ल्यांचा प्रत्येकी रु. ३,०००/-व अन्य पाल्ल्यांना व सभासदांना प्रत्येकी रुपये ३,५००/- संबंधीत सभासदांच्या बचत खात्यामध्ये जमा करुन आणि प्रशस्तिपत्रक देऊन संचालक मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. चालू आर्थिक वर्षात मिळून एकूण ४२९ विद्यार्थी व सभासदांना रुपये १४,०७,५००/- एवढया रकमेचे अधिदान करण्यात आले.

याचबरोबर सदर कार्यक्रमात उपस्थित असलेल्या संबधित पाल्य व सभासदांकरीता श्री.भरत जाधव अभिनित 'अस्तित्व'या दोन अंकी कौटुंबिक नाटकाचा प्रयोग आयोजित केला होता.

मागील वर्षी कार्यक्रमाच्या समारोपापर्यंत उपस्थित राहिलेल्या सभासद व त्यांची पाल्ल्ये यांच्यासाठी लॉटरी पध्दतीने गिफ्ट व्हाउचर जाहीर करण्यात आले होते. गुणगौरव कार्यक्रमास उपस्थित राहून सत्कार करण्यात येणाऱ्या सभासद व पाल्ल्यांना प्रोत्साहन मिळून त्यांचा यथोचित गौरव झाल्याचे बँकेस समाधान प्राप्त झाले. यावर्षी देखील गुणगौरव कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत असून संबंधीत सभासदांनी त्यांच्या पाल्ल्यांचा तसेच संबंधितांच्या गुणपत्रिकेसह दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत संबंधीत शाखा कार्यालयात आपला भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्रमांक नमूद करुन अर्ज सादर करावा.

१४. सभासद कल्याण निधीमधून मिळणा-या बक्षिस रकमेबाबत :

सभासद कल्याण निधीमधून सभासदास त्याच्या निवृत्तीनंतर सभासदत्वाच्या पहिल्या ५ वर्षाकरीता रुपये ५,०००/- व उर्वरित प्रत्येक सभासदत्व वर्षासाठी रुपये ६००/- यानुसार बक्षिस रक्कम देण्यात येते. अहवाल वर्षामध्ये सभासद कल्याण निधीमधून सभासदांना बक्षिस रक्कमेपोटी रुपये ६.०१ कोटीचे अधिदान करण्यात आले आहे.

१५. तातडीची आर्थिक मदत :

सभासद मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबास रुपये ५,०००/- इतकी आर्थिक मदत देण्यात येत होती. परंतु दि. २९/०१/२०२४ पासून सदर आर्थिक मदत ही रु.६०००/- इतकी करण्यात आलेली आहे. अहवाल साली ४०४ सभासदांच्या कुटुंबियास रुपये २४,२३,०००/- इतकी मदत देण्यात आली.

१६. सभासद स्वास्थ्य निधी :

महापालिकेमध्ये सुरु असलेली गट विमा योजना बंद करण्यात आल्यामुळे सभासदांना महापालिकेकडून वैद्यकीय मदत मिळत नसल्याने बँकेने दिनांक ०१.१२.२०१८ पासून, पूर्वी असलेल्या ३२ विविध आजारांच्या यादीमध्ये, ४८ विविध आजार अंतर्भुत केले आहेत जेणेकरुन जास्तीत जास्त सभासदांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. तसेच सभासदास देण्यात येणारी वैद्यकीय मदत, सभासदास झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या अनुषंगाने देण्यात येते. त्यानुसार, वैद्यकीय स्वास्थ्य निधीअंतर्गत देण्यात येणाऱ्या मदतीच्या नियमांमध्ये बदल केले आहेत :-

अ.क्र.	वैद्यकीय खर्चाचा तपशील	देय असलेली वैद्यकीय मदत	
		सभासद (रु.)	अवलंबित (रु.)
१.	रु. ५०,०००/- ते रु. १,००,०००/- पर्यंत	१०,०००/-	५,०००/-
२.	रु. १,००,००१/- ते रु. १,५०,०००/-पर्यंत	१२,५००/-	७,५००/-
३.	रु. १,५०,००१/- ते रु. २,००,०००/-पर्यंत	१५,०००/-	१०,०००/-
४.	रु. २,००,००१/- ते रु. २,५०,०००/-पर्यंत	२०,०००/-	१२,५००/-
५.	रु. २,५०,००१/- व त्यापेक्षा अधिक	२५,०००/-	१५,०००/-
रु. ५०,०००/- पेक्षा कमी खर्च असलेल्या वैद्यकीय मदतीचे अर्ज बँक विचारात घेणार नाही.			

अहवाल वर्षात सदर निधीमधून बँकेच्या ५६ सभासदांना रुपये ९,१९,०९०/- या रकमेची मदत मंजूर करुन सदर रकमेचे अधिदान करण्यात आले आहे. दिनांक २५.०३.२०२० पासून वैद्यकीय मदत आजारांच्या यादीमध्ये कोविड-१९ अंतर्भुत करण्यात आलेला असून सभासद कोरोनाबाधीत झाल्यास त्यांनी रुग्णालयात दाखल केल्याचे कागदपत्रे, कोविड-१९ पॉझिटीव्ह अहवाल व देयके सादर केल्यास वरील तक्त्यानुसार नियमासापेक्ष वैद्यकीय मदत देण्यात येते.

१७. संकट निवारण निधी :

सभासदांना नैसर्गिक आपत्तीत सापडल्यामुळे तसेच आगीमुळे किंवा दंगलीमुळे झालेल्या नुकसानीकरीता रु.१०,०००/- किंवा प्रत्यक्ष झालेल्या आर्थिक नुकसानाची रक्कम यापैकी कमीत कमी रकमेची आर्थिक मदत देण्यात येते. तसेच गंभीर किंवा प्रदीर्घ आजारामुळे आलेले अपंगत्व किंवा कमकुवत झाल्याने पालिकेच्या नोकरीमधून काढून टाकल्यास तसेच नोकरीत असताना कार्यालयीन वेळेत सभासदाचा अपघाती मृत्यू झाल्यास रुपये २५,०००/- रकमेची आर्थिक मदत देण्यात येते. तसेच सभासद वास्तव्य करीत असलेल्या खाजगी किंवा महापालिकेची इमारत कोसळून काही दुर्घटना झाल्यास व सदर दुर्घटनेमध्ये सभासद मृत पावल्यास रुपये २५,०००/- व दुर्घटनेमध्ये जखमी झाल्यास सभासदास रुपये २०,०००/- इतकी आर्थिक मदत नियमांसापेक्ष देण्यात येते.

कोरोना विषाणूच्या (कोविड-१९) प्रादुर्भावामुळे बँकेचे सभासद मृत पावल्यास त्याच्या वारसांस रुपये २५,०००/- इतकी आर्थिक मदत संकट निवारण निधीअंतर्गत देण्यात येते.

१८. सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना बँकेच्या अंतिम निकाली हिशेबाचे अधिदान पे-ऑर्डर, बचत खाते / एन.ई.एफ.टी. द्वारे सेवानिवृत्तीच्या दिवशी देण्याबाबत :

सेवानिवृत्त होणा-या सभासदांना बँकेतर्फे शाखा कार्यालयात शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, डफेल बॅग व सोबत निवृत्त सभासदांना मिळणाऱ्या (Cash Assistance) रकमेचे प्रमाणपत्र देण्यात येते व त्यांचा यथोचित सत्कार करण्यात येतो. महापालिकेच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या बँकेच्या सभासदांचे अंतिम निकाली हिशेब त्यांच्या स्वत:च्या जमा रकमेतून मंजूर होतात अशा सभासदांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशीच अंतिम निकाली हिशेबांचे अधिदान एन.ई.एफ.टी. व बचत खात्याद्वारे करण्यात येते. अहवाल सालामध्ये अशा एकूण ३२०४ सभासदांना सेवानिवृत्तीच्या दिवशीच अंतिम निकाली हिशेबांचे अधिदान करण्यात आले. सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांनी त्यांच्या शेअर्स खाती जमा असलेली रक्कम काढून न घेता 'विशेष ठेव' म्हणून बँकेतच ठेवावी. सदर 'विशेष ठेव' रकमेवर त्या कालावधीत बँकेत लागू असलेल्या महत्तम व्याज दरापेक्षा एक टक्का अधिक व्याज दर देण्यात येईल. तसेच सक्तीची ठेव खाती असलेली रक्कम काढून न घेता 'सक्तीची ठेव' म्हणून बँकेत ठेवावी व सक्तीच्या ठेवीवरील व्याज दराचा लाभ घ्यावा. तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना विनम्र आवाहन करण्यात येते की, सेवानिवृत्तीच्या वेळी महापालिकेकडून मिळणारी रक्कम आपल्या बँकेत ठेवून आकर्षक व्याज दराचा लाभ घ्यावा. ठेवींवरील व्याज आपण रहात असलेल्या नजिकच्या कोणत्याही बँकेत एन.ए.सी.एच., एन.ई.एफ.टी. द्वारे जमा करण्यात येईल.

१९. पेन्शन खाते सुविधा :

आपल्या बँकेला महापालिकेने सभासदांची पेन्शन अधिदान करणाऱ्या बँकांमध्ये समावेश करावा म्हणून संचालक मंडळ प्रयत्नशील होते. आता आपल्या बँकेने स्वत:ची आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. सुविधा सुरु केल्याने महापालिकेने त्यांच्या निवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन खाते आपल्या बँकेत उघडण्याची परवानगी दिली आहे व त्याप्रमाणे बँकेने सदर सुविधा त्वरीत सुरु केली, ज्यामुळे आता बँक सभासदास सेवानिवृत्तीनंतरही बँक सेवा देण्याची संधी प्राप्त झाली आहे. सदर खातेदारांना ए.टी.एम. सुविधा देखील उपलब्ध आहे. अहवाल वर्षात ८७५ पेन्शन खाती सुरु करण्यात आली आहेत. सदर सेवेचा लाभ सर्व सेवानिवृत्त सभासदांनी घ्यावा, ही विनंती.

२०. पॅनकार्ड सुविधा :

बँक सभासदांना पॅनकार्ड सुविधा देत आहे. सदर योजनेअंतर्गत ज्या सभासदांना/ग्राहकांना/त्रयस्थ व्यक्तींना पॅनकार्ड हवे असल्यास तसेच जुने कार्ड बदलून किंवा गहाळ झालेले असल्यास नवीन घ्यावयाचे असल्यास बँकेमार्फत रुपये १०७/- इतके शुल्क घेऊन सदर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अशा सभासद/ग्राहक/त्रयस्थ व्यक्तींचा विनंती अर्ज शाखा कार्यालयांमार्फत यु.टी.आय. इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी अँड सर्व्हिसेस लि. या कंपनीकडे पाठविण्यात येतो. बँकेच्या सर्व सभासदांनी/ग्राहकांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा.

२१. फ्रँकिंग सुविधा :

बँकिग सभासद / ग्राहकांकरिता फ्रँकिग सेवा बँकेच्या मुख्य कार्यालय शाखेत दिनांक ३१/०१/२०२५ पासून सुरू करण्यात आली आहे.

२२. महापालिका सहकार्य :

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि आपली बँक यांचे एक अतूट नाते आहे. मा.महापालिका आयुक्त, मा.अतिरिक्त आयुक्त, मा.सह आयुक्त, मा. उपायुक्त, करनिर्धारक व संकलक, प्रमुख लेखापाल (वित्त), प्रमुख लेखापाल (कोषागार), महापालिकेतील सर्व रुग्णालयांतील अधिष्ठाता, सहाय्यक आयुक्त, विधी अधिकारी, महापालिका जनसंपर्क अधिकारी, इतर सर्व खाते प्रमुख व त्यांचे विभागातील कर्मचारी आणि इतर महापालिका अधिकारी यांनी वेळोवेळी बँकेस दिलेल्या सहकार्याबद्दल संचालक मंडळ त्यांचे ऋणी आहे.

२३. उल्लेखनीय घटना :

बँको या संस्थेतर्फे सन २०२४ करीता पगारदार सहकारी बँक, ठेवी रु.१५०० कोटींच्यावर या गटामध्ये "प्रथम पारितोषिक" व दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लिमिटेड. यांचेमार्फत पगारदार नोकरांच्या गटातील सर्वोत्कृष्ट बँक २०२३-२०२४ करीता 'प्रथम पारितोषिक", बँकिंग फ्रंटिअर्स या संस्थेकडून मोठया यूसीबी गटात बेस्ट सायबर सिक्युरीटी इनिशिएटिव्ह, बेस्ट एच.आर. इनोव्हेशन, बेस्ट ऑडिट इनिशिएटिव्ह हे तीन पुरस्कार, तसेच महाराष्ट्र अर्बन को.ऑप बँक फेडरेशन लिमिटेड यांचेमार्फत पगारदार नोकरांच्या गटातील सर्वोत्कृष्ट बँक २०२४ करीता प्रथम पारितोषिक असे एकूण चार पुरस्कार बँकेस प्राप्त झाले.

२४. नोकर भरती प्रक्रिया :

साल २०२१-२०२२ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेचा स्टाफींग पॅटर्न मंजूर करण्यात आला आहे. सदर स्टाफींग पॅटर्ननुसार, बँकेतील विविध पदनामांच्या ८६ रिक्त पदांची भरती प्रक्रिया सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राज्यातील नागरी सहकारी बँकांना निर्गमित केलेल्या आदेशामध्ये नमूद केलेल्या संस्थांपैकी मेसर्स सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि.या संस्थेमार्फत ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेऊन भरती प्रक्रिया करण्यात आली होती. सदर भरती प्रक्रियेमध्ये जी पदे बँकेत रिक्त राहिली अशा रिक्त पदांची भरती सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर या संस्थेमार्फत ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेऊन करण्यात आली आहे.

२५. शाखांमधील स्पर्धात्मक कामकाज :

बँकेची २१ शाखा कार्यालये असून ग्राहकास उत्तम सेवा प्राप्त व्हावी व कर्मचाऱ्यांमध्ये सेवा प्रदान करण्यात गुणात्मक वृध्दी व्हावी, शाखांमध्ये स्पर्धात्मक कामकाज व्हावे म्हणून संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०१२-१३ पासून शाखानिहाय कामकाजाचे, वस्तूनिष्ठ मुल्यांकन करुन सर्वोत्कृष्ट शाखेस प्रथम पारितोषिक देणे व दुसऱ्या क्रमाकांवरील शाखेस 'प्रोत्साहनपर पारितोषिक' देण्यात येतात.

२६. सभासदांना आवाहन :

प्रत्येक सभासदाने शाखा कार्यालयात जाऊन आपल्या खात्यावर वारसाची त्याचप्रमाणे सध्या रहात असलेल्या वास्तव्याच्या पत्त्याची पुराव्यानिशी नोंद करावी व ती अद्ययावत ठेवावी. तसेच आपला भ्रमणध्वनी क्रमांक बचत खात्यावर नोंदवावा जेणेकरुन एसएमएस अॅलर्ट सुविधेचा तसेच मिस्ड कॉल अलर्ट सेवेचा लाभ सभासदास घेता येईल. बहुतांशी सभासदांची बचत खाती आपल्या बँकेमध्ये आहेत. ज्या सभासदांची बचत खाती आपल्या बँकेत नव्हती, त्या सभासदांची बचत खाती बँकेत शून्य शिलकेने या अगोदर उघडण्यात आलेली आहेत,

अशा सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधीत शाखेशी संपर्क साधून के.वाय.सी. नॉर्म्सनुसार संबंधीत कागदपत्रांची पूर्तता करुन सदर खाते नियमित करुन घ्यावे. ज्या सभासदांचे बँकेकडे अन्य बचत खाते असल्यास त्याने पत्राद्वारे सदर बचत खात्याची माहिती द्यावी जेणेकरुन असे बचत खाते सभासदाच्या सी.आय.एफ. बरोबर जोडण्यात येईल. अशा सभासदांचे 'नो फ्रील' खाते बंद करण्यात येईल. कारण एकाच सभासदाच्या एकाच नावाची दोन बचत खाती ठेवता येत नाहीत. सर्व सभासदांचे सक्तीच्या ठेवीवरील व्याज रक्कम व लाभांश रक्कम सभासदांच्या बँकेकडील बचत खात्यात जमा करण्यात येत आहे. आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून सक्तीच्या ठेवीवरील व्याजावर उगमस्थानी कर कपात (TDS) करुन उर्वरीत रक्कम सभासदांच्या बचत खाती जमा करण्यात येत आहे. सभासदांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे पत्ते पिनकोडसहीत व भ्रमणध्वनी क्रमांक अद्ययावत नसल्यास करुन घ्यावेत, जेणेकरुन बँकेला त्यांच्याशी संपर्क करणे व खात्याच्या व्यवहाराची माहिती मोबाईल मेसेज सेवेमार्फत देणे शक्य होईल.

२७. अध्यक्ष :

अहवाल वर्षात सन्माननीय महापालिका आयुक्त व बँकेचे पदसिध्द अध्यक्ष श्री. भूषण गगराणी यांच्या प्रशासकीय सेवेचा व प्रदीर्घ अनुभवाचा बँकेच्या संचालक मंडळास तसेच प्रशासनास अमूल्य लाभ झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेने चांगल्या प्रकारे प्रगती साधली असून संचालक मंडळ व प्रशासन यांना त्यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले आहे. संचालक मंडळ त्याबद्दल त्यांचे अत्यंत ऋणी आहे.

२८. उपाध्यक्ष :

अहवाल वर्षात मा. महापालिका अतिरिक्त आयुक्त व बँकेचे उपाध्यक्ष श्री. अभिजीत बांगर यांच्या प्रशासकीय सेवेचा व प्रदीर्घ अनुभवाचा बँकेच्या संचालक मंडळास व प्रशासनास अमूल्य लाभ झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेने चांगल्या प्रकारे प्रगती साधली असून संचालक मंडळ व प्रशासन यांना त्यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले आहे. संचालक मंडळ त्याबद्दल त्यांचे अत्यंत ऋणी आहे.

२९. संचालक मंडळ :

सभासदांचे हित सतत नजरेसमोर ठेवून त्यांना उत्तम ग्राहक सेवा आणि अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न संचालक मंडळ करीत असून त्या दृष्टीने निरंतर प्रयत्न चालू आहेत. बँकेला एक वेगळी दिशा देण्याच्या दृष्टीने प्रशासकीय सुधारणा, कार्यालये आणि शाखांचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, कोअर बँकींग, ए.टी.एम. स्थापित करणे, नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करुन अद्ययावत बँकींग सुविधा प्रदान करणे इत्यादी प्रकल्प कार्यान्वित केले असून नजिकच्या काळात बँकेची पत-प्रतिष्ठा वाढून बँकेचे वेगळेपण जाणवेल या दृष्टीने संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. अहवाल साली संचालक मंडळाच्या एकूण १३ सभा झाल्या. बँकेच्या संचालक मंडळ (साल २०२०-२०२५) सदस्यांचा कार्यकाळ दिनांक १९/०२/२०२५ रोजी संपुष्टात आला असून राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर यांनी दिनांक १६/०७/२०२५ रोजीच्या पत्रकाद्वारे साल २०२५-२०३० कालावधीची निवडणूक प्रक्रिया राबविण्यास सुरुवात केल्याने दिनांक १७/०७/२०२५ रोजीपासून लागू झालेल्या आचारसंहितेच्या अनुषंगाने संचालक मंडळ सदस्यांच्या सभा आयोजित करण्यात आलेल्या नाहीत.

३०. संचालक मंडळ निवडणूक :

संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर यांच्याद्वारे दिनांक २१.०८.२०२५ रोजी पार पडली असून नवीन संचालक मंडळ कार्यरत झालेले आहे.

३१. बँकेतील उप-समित्या :

- **सर्वसाधारण कामकाज समिती :**

  बँकेच्या आर्थिक व्यवहारासंबंधीचे सर्व प्रस्तावावर या समितीत चर्चा होऊन रुपये ७५,०००/- रकमेपर्यंतचे प्रस्तावास मान्यता देऊन उर्वरित प्रस्तावांची संचालक मंडळास शिफारस केली जाते. तसेच सदर समितीच्या निपटारा सभेत अदत्त दावे, निकाली हिशेब व अनुत्पादीत कर्जासंबंधी शाखेमार्फत होणाऱ्या पाठपुरावा व वसुलीसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येते व आढावा घेण्यात येतो. अहवाल सालात समितीच्या ८५ सभा झाल्या. सर्वसाधारण कामकाज समिती व संगणक, सल्लागार व विधी या दोन्ही समितींचे एकत्रिकरण करून दिनांक ०१/१२/२०२४ पासून सर्वसाधारण कामकाज, संगणक सल्लागार व विधी समिती या नावाने स्थापित करण्यात आली. अहवाल वर्षात या समितीच्या एकूण ४५ सभा झाल्या.

- **कर्जव्यवहार समिती :**

  सभासदांची कर्जे मंजूर करण्याचे आणि त्यासंबंधीच्या कामकाजाचे निर्णय घेण्याचे अधिकार संचालक मंडळाने या समितीस दिले आहेत. अहवाल सालात समितीच्या १३२ सभा झाल्या.

- **लेखा परिक्षण समिती :**

  भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अधिकाऱ्यांनी संगणक, सल्लागार, विधी व लेखा परिक्षण समितीचे विभाजन करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार समित्यांचे विभाजन करुन स्वतंत्र लेखा परिक्षण समितीची स्थापना करण्यात आली. लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करुन पूर्तता अहवाल मागविणे या जबाबदाऱ्या सदर समितीवर सोपविण्यात आल्या आहेत. अहवाल साली या समितीच्या एकूण १३ सभा झाल्या.

- **कर्मचारी समिती :**

  कर्मचाऱ्यांसंबंधीच्या विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार या समितीचे असून अहवाल वर्षात या समितीच्या एकूण १५ सभा झाल्या.

- **संगणक, सल्लागार व विधी समिती :**

  बँकेत संपूर्ण संगणकीकरणाच्या दृष्टीने उपयुक्त असे निर्णय घेणे तसेच बँकेचे ध्येय, धोरण विकास आराखडा ठरविणे, कायदेविषयक बाबी हाताळणे हया जबाबदाऱ्या सदर समितीवर सोपविण्यात आल्या आहेत. अहवाल साली या समितीच्या एकूण ५६ सभा झाल्या.

- **गुंतवणूक समिती :**

  अहवाल वर्षात या समितीच्या एकूण ३५ सभा झाल्या.

- **ग्राहक सेवा, ग्राहक तक्रार निवारण समिती :**

  ग्राहक सेवेसंबंधीत विविध धोरणे, तक्रारी व सूचनांकरीता ग्राहक सेवा तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली. अहवाल वर्षात सदर समितीच्या ६ सभा झाल्या.

- **इमारत खरेदी / वाटाघाटी समिती:**

  अहवाल वर्षात सदर समितीच्या २ सभा झाल्या.

- **जोखीम आधारीत अंतर्गत लेखा समिती (Risk Based Internal Audit (RBIA):**

  भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार, जोखीम व्यवस्थापन समितीची स्थापना सन २०२३-२४ मध्ये करण्यात आली. सदर समितीची २ सभा झाली.

- **विशेष समिती (Special Committee for Monitoring Fraud):**

  फसवणूकीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सदर समितीची स्थापना करण्यात आली. अहवाल साली समितीची १ सभा झाली.

- **विश्वस्त समिती :**

  - **उपदान निधी समिती (Gratuity Committee) :**

    अहवाल वर्षात सदर समितीच्या ६ सभा झाल्या.

  - **भविष्य निर्वाह निधी समिती (Provident Fund Committee) :**

    अहवाल वर्षात सदर समितीची १ सभा झाली.

- **अंतर्गत समिती :**

  - **अंतर्गत तक्रार निवारण समिती (प्रतिबंध, संरक्षण व निवारण) :**

    महिलांच्या लैंगिक छळाविरुध्द प्रतिबंध संरक्षण व निवारण कायदा २०१३ अंतर्गत बँकेतील महिलांच्या लैंगिक छळांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली. अहवाल वर्षात या समितीच्या एकूण ६ सभा झाल्या.

- **अल्को समिती (असेट लायबिलिटी कमिटी) :**

  अहवाल वर्षात या समितीच्या एकूण ४ सभा झाल्या.

- **इन्फॉर्मेशन सिक्युरिटी सिस्टीम कमिटी :**

  अहवाल वर्षात या समितीच्या एकूण ३ सभा झाल्या.

३२. श्रध्दांजली :

अहवाल वर्षात जे सभासद व बँक कर्मचारी मृत झाले त्यांच्याबदल संचालक मंडळ दु:ख प्रकट करीत असून मृत सभासद व बँकेचे मृत कर्मचारी यांच्या कुटुंबियांच्या दु:खात संचालक मंडळ व समस्त कर्मचारीवृंद सहभागी आहे.

३३. सदिच्छा :

अहवाल साली बँकेचे जे सभासद व कर्मचारी निवृत्त झाले त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो अशी सदिच्छा संचालक मंडळातर्फे मी व्यक्त करीत आहे.

३४. ऋणनिर्देश :

बँकेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, विभागीय सह-निबंधक, मुंबई विभाग, जिल्हा उप-निबंधक मुंबई (१) शहर व त्यांचे कार्यालयातील कर्मचारी/अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् फेडरेशन, बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन, भारतीय बँक संघ, नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स्, नवी दिल्ली, सहकारी संस्था, नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., क्लिअरींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., अध्यक्ष, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन, महाराष्ट्र एम्प्लॉईज बँक्स् को-ऑपरेटिव्ह असोसिएशन मुंबई, मे. फिनॅकस सोल्युशन्स प्रा.लि., मेसर्स फिनकोर ॲडव्हायझर्स सर्व्हिसेस प्रा. लि., श्री. राकेश ओझा (मे. मार्केट ट्रॅकर) आय.डी.बी.आय. बँक (सायन शाखा), मेसर्स स्कोअरटेक,मेसर्स इन्सेप्टिका टेक्नॉलॉजिज, मेसर्स कॅटालिस्ट ट्रस्टीशीप प्रा. लि., मेसर्स वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ को-ऑपरेटीव्ह मॅनेजमेंट, महापालिकेच्या विविध कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच कळत - नकळत अहवाल सालात ज्यांचे बँकेला सहकार्य व मौखिक मार्गदर्शन लाभले त्या सर्वांचे संचालक मंडळाच्या वतीने मी आभार मानतो. संचालक मंडळाच्या सर्व सदस्यांकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल मी व्यक्तिश: सर्वांचा आभारी आहे.

संस्थेची प्रगती सभासद, खातेदार, संस्थेचे व्यवस्थापन तसेच संस्थेच्या हितचिंतकांवर अवलंबून असते. या प्रगतीमध्ये कर्मचारी/अधिकारी यांची निष्ठा, त्यांनी सभासदांना दिलेली सेवा तसेच व्यवस्थापनास दिलेला सहयोगही महत्वाचा आहे. कर्मचारी व व्यवस्थापन यांचे संबंध सलोख्याचे आहेत. बँकेच्या कामकाजात कर्मचारी मनापासून काम करीत आहेत व यापुढेही करतील असा विश्वास वाटतो. संचालक मंडळ बँकेच्या दिवसेंदिवस होत असलेल्या प्रगतीबद्दल सभासद, खातेदार, हितचिंतक तसेच बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा ऋणी आहे.संचालक मंडळाच्या वतीने व वैयक्तिकरित्या मी आपले पुन:श्च आभार व्यक्त करतो.

आपला स्नेहांकित,



(किशोर गांधी)
कार्याध्यक्ष

BALANCE SHEET / ताळेबंद पत्रक
AS ON MARCH 31, 2025 / दि. ३१ मार्च, २०२५ अखेरचे

(Amount in ₹)

Capital and Liabilities भांडवल व देणी	Schedule परिशिष्ट	Current Year चालू वर्ष 31.03.2025	Previous Year मागील वर्ष 31.03.2024
1) Capital **भांडवल**	1	1,54,10,54,000	1,39,30,62,300
2) Reserve Fund & Other Reserves **राखीव निधी व इतर निधी**	2	7,91,88,30,434	7,25,49,39,543
3) Deposits & Other Accounts **ठेवी व इतर खाती**	3	43,84,55,47,533	42,57,61,59,666
4) Borrowings **कर्जे**	4	-	-
5) Overdue Interest Reserve on Loans & Advances (As per Contra) **थकित व्याज निधी**		16,89,99,652	12,28,38,860
6) Interest Payable **व्याज देणे**		98,73,54,031	93,75,16,156
7) Other Liabilities **इतर देणी**	**5**	1,27,76,52,232	4,35,43,86,220
8) Profit & Loss **नफा व तोटा**	**6**	1,45,98,26,484	1,41,16,23,537
Total एकूण		**57,19,92,64,366**	**58,05,05,26,283**
Contingent Liabilities : आकस्मिक दायित्वे	13	**8,16,96,556**	**8,24,29,903**

NOTES TO ACCOUNTS FORM PART OF ACCOUNTS AS PER OUR REPORT OF EVEN DATE

For **M/S LAHOTI KASAT & CO**
CHARTERED ACCOUNTANTS
FIRM REG.NO. 105509W

(CA ROHIT KASAT)
PARTNER. 151410
PLACE : MUMBAI

DATE : 25.06.2025
UDIN. .25151410BMKVVP5279

(Amount in ₹)

Property and Assets मालमत्ता व येणे	Schedule परिशिष्ट	Current Year चालू वर्ष 31.03.2025	Previous Year मागील वर्ष 31.03.2024
1) Cash रोख	7	35,24,46,740	40,23,39,187
2) Balances with other Banks इतर बँकातील शिल्लक	8	10,23,40,50,079	10,11,41,36,167
3) Money at Call and Short Notice अल्प सूचना व अल्प मुदत रक्कम		89,00,00,000	-
4) Investments गुंतवणूक	9	12,99,75,85,909	12,54,43,60,163
5) Advances कर्जे	10	31,23,21,38,694	30,71,75,13,528
6) Interest Receivable व्याज येणे			
i. On Investments गुंतवणुकीवरील		31,35,47,378	25,88,80,972
ii. On Loans & Advances (As per Contra) कर्जावरील		16,89,99,652	12,28,38,860
7) Bills Receivable Being Bills for Collection as per Contra		-	-
8) Branch Adjustments शाखा जुळणी		-	-
9) Fixed Assets स्थावर मालमत्ता	11	4,01,25,648	4,69,39,814
10) Deffered Tax Asset डिफर्ड कर मालमत्ता		32,08,64,648	29,44,38,992
11) Other Assets इतर मालमत्ता	12	64,95,05,618	3,54,90,78,601
Total एकूण		**57,19,92,64,366**	**58,05,05,26,283**

SIGNATURE TO THE ACCOUNTS INCLUDING SCHEDULE & NOTES ON ACCOUNTS

FOR THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD.MUMBAI

V.H.RAVADKA	V.G.GHUMRE	P.B.SAWANT	K.B.GANDHI	D.S.KSHIRSAGAR
GENERAL MANAGER	DIRECTOR	DIRECTOR	DIRECTOR	VICE CHAIRMAN

PROFIT & LOSS ACCOUNT / नफा तोटा पत्रक
AS ON MARCH 31, 2025 / दि. ३१ मार्च, २०२५ अखेरचे

(Amount in ₹)

Expenditure खर्च	Current Year चालू वर्ष 31.03.2025		Previous Year मागील वर्ष 31.03.2024
1) Interest on Deposits, Borrowings, etc. ठेवी व कर्जावरील व्याज		**3,03,60,29,252**	**2,60,40,41,842**
2) Salaries and Allowances, Provident Fund पगार आणि भत्ते, भविष्य निधी फंड		**37,24,47,124**	**36,46,07,062**
3) Directors' and local committee members' fees and allowances संचालक व स्थानिक समिती सदस्यांची फी व भत्ते		**1,17,60,613**	**1,08,97,057**
4) Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. भाडे, कर, वीमा, वीज इ.		**4,32,38,322**	**3,83,52,558**
5) Law Charges वकील व सल्ला फी		**2,84,700**	**3,00,560**
6) Postage, Telegram and Telephone charges टपाल, टेलिफोन खर्च		**10,29,545**	**11,53,221**
7) Auditor's fees हिशेब तपासनीसांची फी		**69,55,800**	**67,50,750**
8) Depreciation and repair to property घसारा खर्च		**1,06,17,905**	**1,29,48,274**
9) Stationery, printing and advertisement, etc. छपाई, स्टेशनरी आणि जाहिरात		**30,96,507**	**33,19,388**
10) Loss from sale of or dealing with non-banking assets			**-**
11) Other Expenditure : इतर खर्च			
i) General Body Meeting Expenses वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च	8,03,223		6,65,403
ii) Deposit Insurance Premium ठेवीवरील विम्याचा हप्ता	5,14,46,008		4,71,38,196
iii) Conveyance प्रवास खर्च	6,90,957		6,49,270
iv) Computer Expenses संगणक खर्च	5,77,14,728		5,26,04,961
v) Miscellaneous Expenses संकीर्ण खर्च	6,45,93,580		5,85,29,392
vi) Paysheet recovery Charges (MCGM) पेशीट रिकव्हरी आकार (मुंबई महानगर पालिका)	10,36,542		11,03,610
vii) Service charges Clearing RBI समाशोधन सेवा आकार	1,11,115		1,28,006
viii) Security Hire charges सुरक्षा सेवा शुल्क	83,16,854		71,91,802
ix) Amortisation of Premium on Securities कर्जरोखे चढभाव खर्च	18,70,470		18,82,126
x) Contribution towards Staff Retirement Benefit Fund पगारी रजेकरीता तरतूद	5,45,36,268		4,72,70,975
xi) Election Expenses निवडणूक खर्च			30,00,000
xii) Gratuity for Staff कर्मचाऱ्यांकरीता ग्रच्युइटी	1,12,09,276		62,70,360
xiii) CGST Paid सी जी एस टी	1,98,74,759		1,80,49,121
xiv) SGST Paid एस जी एस टी	1,98,74,759		1,80,49,121
xv) IGST Paid आय जी एस टी	19,90,753		12,01,594
		29,40,69,291	
12) Provisions : तरतूद			
i) Provision for Standard Asset स्टॅण्डर्ड मालमत्तेसाठी तरतूद	36,00,000		69,00,000
ii) Provision for bad and Doubtful Debts बुडीत व आनिश्चित कर्जाकरीता तरतूद	10,77,00,000		18,80,00,000
		11,13,00,000	
		3,89,08,29,059	**3,50,10,04,650**
13) Provision for Income Tax आयकर करीता तरतूद		**33,59,20,000**	**30,66,70,000**
14) Net Profit carried to Balance Sheet निव्वळ नफा		**78,69,05,168**	**76,45,68,781**
Total एकूण		**5,01,36,54,227**	**4,57,22,43,432**

NOTES TO ACCOUNTS FORM PART OF ACCOUNTS AS PER OUR REPORT OF EVEN DATE

For **M/S LAHOTI KASAT & CO**
CHARTERED ACCOUNTANTS
FIRM REG.NO. 105509W

(CA ROHIT KASAT)
PARTNER. 151410
PLACE : MUMBAI

DATE : 25.06.2025
UDIN. .25151410BMKVVP5279

(Amount in ₹)

Income उत्पन्न	Current Year चालू वर्ष 31.03.2025	Previous Year मागील वर्ष 31.03.2024
1) Interest & Discount व्याज आणि कमिशन	**4,76,72,22,932**	**4,49,71,71,298**
2) Insurance Agency Commission आयुर्विमा पॉलिसीवरील कमिशन	**4,680**	**5,010**
3) Other Receipts इतर येणी		
Dividend on shares of MDCC बँकेच्या भागावरील लाभांश मुंबई जिल्हा मध्यवर्ती को-ऑप.बँक लि.	-	**15,15,000**
4) Miscellaneous Receipts संकीर्ण येणी		
i) Penalty recovered from Contractor कंत्राटदाराकडून केलेली दंड वसुलीची रक्कम	10,46,741	6,70,556
ii) Commission on Miscellaneous Other इतर संकीर्ण कमिशन	49	15,12,029
iii) Service Charges from N.P.C.I. एन.पी.सी.आय कडून मिळालेले सेवा शुल्क	37,90,494	41,24,695
iv) Commission on Pay Order पे ऑर्डरवरील कमिशन	63,158	65,343
v) Incidental Charges अनुषंगिक शुल्क	81,60,444	29,03,279
vi) Safe Deposit Locker's Rent. लॉकर भाडे	18,26,880	17,83,825
vii) Processing Charges for Hsg.Loan गृह कर्जासांठी प्रोसेसिंग शुल्क	94,500	3,37,482
viii) Other Miscellaneous Receipt. इतर संकिर्ण येणी	30,92,065	38,96,955
ix) Profit on sale of Fixed Asset स्थिर मालमत्तेच्या विक्रीवरील नफा	52,000	2,13,640
x) Commission on ATM Transaction एटीएम व्यवहारातील कमिशन	81,89,869	78,28,478
xi) Profit On Sale Of Security	22,81,701	69,93,760
xii) Commission on POS Transaction पॉस व्यवहारातील कमिशन	7,22,244	35,96,281
xiii) Comm Recd on UPI युपीआय व्यवहारातील कमिशन	33,06,045	7,61,324
xiv) Profit on sale of vehicle	-	1,82,507
xv) GST SET OFF	3,27,68,570	1,74,90,461
xvi) Prior Period Income	1,272	-
(xviii) Rounding Off Account	56	-
xvii) Commission Received On Franking	21,382	-
(xix) IN Late Charges	66,385	-
(xx) Recovery from w/o cases (From 2022-	43,27,542	-
(xxi) Commission received from stamp office	6,788	-
(xxiii) Reversal of excess provision	14,89,23,838	-
(xxiv) Interest received on refund	12,58,936	-
(xxv) Bank Commission	-	352
5) Deffered tax Income डिफर्ड उत्पन्न	**2,64,25,656**	**2,11,91,158**
Total एकूण	**5,01,36,54,227**	**4,57,22,43,432**

SIGNATURE TO THE ACCOUNTS INCLUDING SCHEDULE & NOTES ON ACCOUNTS

FOR THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD.MUMBAI

V.H.RAVADKA	V.G.GHUMRE	P.B.SAWANT	K.B.GANDHI	D.S.KSHIRSAGAR
GENERAL MANAGER	DIRECTOR	DIRECTOR	DIRECTOR	VICE CHAIRMAN

Schedules Forming Part Of Accounts ताळेबंद पत्रकाचा भाग बनणारे परिशिष्ट
For the year Ended 31st March 2025 दि. ३१ मार्च, २०२५ अखेरचे

SCHEDULE 1 - CAPITAL भांडवल

(Amount in ₹)

	Current Year चालू वर्ष 31.03.2025	Previous Year मागील वर्ष 31.03.2024
i) Authorised Capital :		
3,00,00,000 Shares of Rs.100/- each (Previous year 3,00,00,000 shares of Rs.100/- each)	**3,00,00,00,000**	**3,00,00,00,000**
अधिकृत भाग भांडवल :		
३ ,००,०,००० भाग प्रत्येकी रु. १००/- चा		
(मा. व. ३,००,००,००० भाग प्रत्येकी रु. १००/-चा)		
Subscribed & Called up Capital :		
1,54,10,540 Shares of Rs.100/- each (Previous year 1,39,30,623 shares of Rs.100/- each)	1,54,10,54,000	1,39,30,62,300
१,५४,१०,५४० भाग प्रत्येकी रु. १००/- चा		
(मा. व. १,३९,३०,६२३ भाग प्रत्येकी रु. १००/-चा)		
Of the above held by:		
a) Individuals वैयक्तिक *	1,54,10,54,000	1,39,30,62,300
b) Co-operative institutions सहकारी संस्था	-	-
c) State Government राज्य सरकार	-	-
*Under the item "individuals" include shares held by the institutions other than co-operative institutions and state government are included as per The Banking Regulation Act,1949.		
Total एकूण	**1,54,10,54,000**	**1,39,30,62,300**

SCHEDULE 2 - RESERVE FUND & OTHER RESERVES राखीव निधी व इतर निधी

(Amount in ₹)

	Current Year चालू वर्ष 31.03.2025	Previous Year मागील वर्ष 31.03.2024
i) Statutory Reserve वैयक्तिक निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	2,32,06,76,269	2,11,29,16,446
Add : Appropriation अधिक : नफा विभागणी	18,58,44,406	20,77,18,425
Add: Addition during the year अधिक : वर्षभरातील जमा	40,792	41,399
	2,50,65,61,467	**2,32,06,76,269**
ii) Building Fund इमारत निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	50,21,11,667	43,51,11,667
Add : Appropriation अधिक : नफा विभागणी	5,00,00,000	6,70,00,000
	55,21,11,667	**50,21,11,667**
iii) Dividend Equalisation Fund समतोल नफा वाटणी निधी	15,66,26,076	15,66,26,076
Less:- Transfer to Reserve for general Purposes	15,66,26,076	-
Closing Balance	**-**	**15,66,26,076**
iv) Reserve for General Purposes		
Opening balance आरंभिची शिल्लक	-	-
Add:- Transfer from Dividend Equalisation Fund	15,66,26,076	-
Closing Balance	**15,66,26,076**	-
v) Special Bad Debts Reserve विशेष बुडित कर्जे निधी	-	-

	Current Year चालू वर्ष 31.03.2025	Previous Year मागील वर्ष 31.03.2024
vi) A) BAD & DOUBTFUL DEBTS RESERVE बुडित व अनिश्चित कर्जे निधी		
Opening Balance आरंभिची शिल्लक	1,02,94,93,363	82,72,09,087
Add : Provision during the Year अधिक : वर्षभरातील तरतूद	10,77,00,000	18,80,00,000
Add:- Recovery from written off accounts	-	3,97,04,384
Less: Write Off during the Year वजा : वर्षभरातील निर्लेखित कर्जे	1,21,17,360	2,54,20,108
	1,12,50,76,003	**1,02,94,93,363**
B) B.D.D.R. (ALLOWED UNDER INCOME TAX ACT) बुडित व अनिश्चित कर्जे (आयकर नियमानुसार)	**29,49,77,514**	**29,49,77,514**
vii) PROVISION FOR STANDARD ASSETS स्टँडर्ड मालमत्तेसाठी तरतूद		
Opening Balance आरंभिची शिल्लक	11,97,49,072	11,28,49,072
Add : Provision during the Year अधिक : वर्षभरातील जमा	36,00,000	69,00,000
	12,33,49,072	**11,97,49,072**
viii)SPECIAL RESERVES U/s 36 (i) (viii) खास : निधी ३६(१)(८) अंतर्गत	**25,12,000**	**25,12,000**
ix) SURETYSHIP GUARANTEE FUND जामिनकी हमी निधी		
Opening Balance आरंभिची शिल्लक	1,02,05,03,558	91,95,70,732
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	-	3,00,00,000
Add: Addition during the year अधिक : वर्षभरातील जमा	2,66,19,181	3,38,74,255
Add:- Recovery from written off accounts अधिक : निर्लेखित कर्जांची वसुली	28,88,254	-
Less: Write off of Branch वजा : निर्लेखित	-	-
Less: Recovery from Written off accounts Tr to BDDR वजा: निर्लेखित कर्जांचा BDDR खाती वरती केलेली वसुली	-	2,72,58,648
Add: Int on earmarked Govt.securities अधिक : निर्धारित शासकीय सिक्युरिटीजवर व्याज	7,63,33,052	6,43,17,219
	1,12,63,44,045	**1,02,05,03,558**
x) INVESTMENT DEPRECIATION RESERVE / कर्ज रोखे घट निधी		
Opening Balance आरंभिची शिल्लक	9,72,97,801	6,72,97,801
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	-	3,00,00,000
	9,72,97,801	**9,72,97,801**
xi) MEDICAL AID FUND सभासद स्वास्थ निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	13,67,78,576	11,27,00,076
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	2,50,00,000	2,50,00,000
Less:Payments during the year वजा : वर्षभरातील दिलेली रक्कम	9,19,090	9,21,500
	16,08,59,486	**13,67,78,576**
xii) CALAMITY FUND संकट निवारण निधी		
Opening Balance आरंभिची शिल्लक	6,08,91,570	5,83,91,570
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	-	25,00,000
Less:Payments during the year वजा : वर्षभरातील दिलेली रक्कम	-	-
	6,08,91,570	**6,08,91,570**
xiii) EDUCATION FUND शिक्षण निधी		
Opening Balance आरंभिची शिल्लक	25,85,74,397	21,99,25,908
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	3,72,00,000	4,16,00,000
Less:Payments during the year वजा : वर्षभरातील दिलेली रक्कम	47,94,746	29,51,511
	29,09,79,651	**25,85,74,397**
xiv) RESERVE FOR REPAIR & RENOVATION दुरुस्ती व नुतनीकरणासाठी निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	10,11,64,831	9,60,07,644
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	1,25,00,000	1,25,00,000
Less: Payments during the year वजा : वर्षभरातील दिलेली रक्कम	1,25,22,738	73,42,812
	10,11,42,093	**10,11,64,831**

(Amount in ₹)

	Current Year चालू वर्ष 31.03.2025	Previous Year मागील वर्ष 31.03.2024
xv) MEMBERS WELFARE FUND सभासद कल्याण निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	59,41,04,367	54,93,71,499
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	5,00,00,000	5,00,00,000
Add: Interest credited during the year अधिक : वर्षभरातील व्याज जमा	-	4,61,64,167
Add: Interest on MWF contribution अधिक : सभासद कल्याण वर्गणीवरील व्याज	5,17,48,572	24,41,864
Add: Rectification अधिक : दुरुस्ती	-	-
Less: Cash Assistance वजा : रोख सहाय्य	6,00,57,772	5,38,73,163
	63,57,95,167	**59,41,04,367**
xvi) RESERVE FOR CONTINGENCIES		
Opening balance आरंभिची शिल्लक	2,31,73,015	2,25,72,015
Add: Appropriation during the year अधिक : नफा विभागणी	25,00,000	25,00,000
Less: Payments during the year वजा : वर्षभरातील दिलेली रक्कम	24,23,000	18,99,000
	2,32,50,015	**2,31,73,015**
xvii) COMPUTER FUND संगणक निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	22,15,06,537	17,15,06,537
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	2,50,00,000	5,00,00,000
	24,65,06,537	**22,15,06,537**
xviii) DEVELOPMENT FUND विकास निधी	**90,833**	**90,833**
xix) STAFF WELFARE FUND कर्मचारी कल्याण निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	2,71,22,751	1,86,94,943
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	1,00,00,000	1,00,00,000
Less:- Scholarship to staff	1,68,100	-
Less:- MME fees	900	-
Less: Payments during the year वजा वर्षभरातील दिलेली रक्कम	11,14,613	15,72,192
	3,58,39,138	**2,71,22,751**
xx) RESERVE FOR SAFE DEPOSIT VAULT सुरक्षित जमा कक्ष निधी	**20,90,833**	**20,90,833**
xxi) INVESTMENT FLUCTUATION FUND अस्थिर गुंतवणूक निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	25,35,02,365	23,85,02,365
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	2,50,00,000	1,50,00,000
	27,85,02,365	**25,35,02,365**
xxii) SOCIAL OBLIGATION FUND सामाजिक बांधिलकी निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	1,01,93,811	88,46,211
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	15,00,000	15,00,000
Less: Payments during the year वजा : वर्षभरातील दिलेली रक्कम	2,11,864	1,52,400
	1,14,81,946	**1,01,93,811**
xxiii) RETIRED MEMEBER WELFARE FUND निवृत्त सभासद कल्याण निधी		
Opening balance आरंभिची शिल्लक	2,17,98,336	2,07,96,848
Add: Appropriation अधिक : नफा विभागणी	25,00,000	25,00,000
Less: Payments during the year वजा : वर्षभरातील दिलेली रक्कम	20,53,182	14,98,511
	2,22,45,154	**2,17,98,336**
xxiv) HEAD OFFICE BUILDING LEASE RENEWAL		
Opening balance आरंभिची शिल्लक	-	-
